# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

सभा क्र.०३/ २०१६ दिनांक २९.०२.२०१६

स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर वेळ- सायंकाळी ६.०० वाजता

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक २९.०२.२०१६ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ६५२१/ २०१६, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सोमवारी दिनांक २९.०२.२०१६ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं. ०१ डॉ.दादासाहेब लु.कांबळे, वैद्यकीय अधिकारी (त्वचारोग) कामावर हजर झालेचे तारखेपासून वेतनश्रेणी देणेबाबत.**

प्रस्ताव- डॉ. दादासाहेब लु. कांबळे, वैद्यकीय अधिकारी (त्वचारोग) यांना हजर तारखेपासुन वेतनश्रेणी लागु करावी किंवा कसे याबाबतचा विषय दि. १६/०२/२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेसमोर सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. १६५ खालीलप्रमाणे झाला आहे.

"डॉ. दादासाहेब लुमा कांबळे, वैद्यकीय अधिकारी (त्वचारोग) कामावर हजर झालेचे तारखेपासुन वेतनश्रेणी देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय घेणेसाठी त्यांचेबाबतीत मा.उच्च न्यायालयाने काय आदेश दिलेला आहे यासह विषय सादर करावा तोपर्यंत सदरहू प्रस्ताव स्थगित ठेवणेत यावा."

सदरहू विषयाची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

मा.महाराष्ट्र शासनाची आकृतीबंधास मान्यता नसलेने डॉ. कांबळे यांची जा.नं.एसएसएस/ वशी०१/ १०९७०/ २००५ दि. ०१/१०/२००५ अन्वये वैद्यकीय अधिकारी या पदावर शासनाच्या मान्यतेस अधीन राहुन दरमहा रु.२१,०००/- मानधनावर नेमणूक करण्यात आली. सदर नेमणूक पत्रात Salary will be confirmed after definite directives from the State Government असे नमुद केलेले आहे. त्यास अनुसरुन ते दि. १४/१०/२००५ रोजी संस्थान सेवेत रुजु झाले.

त्यानंतर दि. ०५/११/२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ६६७ अन्वये कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळालेनंतर डॉ. दादासाहेब लु. कांबळे व इतर यांना हजर तारखेपासून वेतनश्रेणीवर नेमणूका देण्यास व देय होणारी फरकाची रक्कम आदा करण्यास मान्यता देण्यात आलेली होती त्याप्रमाणे जा.नं.एसएसएस/ वशी०१/७५/२००५ दि. ०७/०१/२००६ अन्वये आदेश पारित करणेत आला आहे.

त्यानंतर दि. ०१/१०/२००६ पासून त्यांचे मासिक मानधन रु. २१,०००/- वरुन वाढ करुन रु. ३०,०००/- करण्यात आले. आकृतीबंधास महाराष्ट्र शासनाचे निर्णय क्र. सासवि२००९-४३३(३७/०९) का सोळा दि. ०७.०८.२००९ अन्वये मान्यता मिळाली. त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार जा.नं.एसएसएस/ वशी०१/ १२०५/ २०१० दि.१०/०४/२०१० अन्वये डॉ.कांबळे यांना दि. ०१/०४/२०१० पासून वेतनबँड रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६००/- मध्ये वेतन अदा केले जात आहे त्यानुसार दरवर्षी वार्षिक वेतनवाढ देणेत आली आहे.

तथापि, रुग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ व २००९ साली मान्यता मिळाल्याने उपरोक्त नमुद केलेल्या दि.०५/११/२००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.६६७ ची अंमलबजावणी त्यावेळी नमुद करणेत आलेली नाही असे दिसते.

यापूर्वी डॉ. दादासाहेब लुमा कांबळे, असो. कन्सलटंट श्री साईनाथ रुग्णालय यांनी रुजू झालेल्या तारखेपासुन वेतनश्रेणी लागू करणेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर रिट पिटीशन नं.८९११/ २०१३ दाखल केले होते. त्यावर मा. न्यायालयाने १९ मार्च २०१४ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले होते.

In that view of the matter, writ petition is disposed off with direction to respondent to decide the representation dated 09.09.2012 and 23.02.2013 made by the petitioner, if already not decided, as expeditiously as possible, however, within two months from today.

मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सदरच्या विषयावर निर्णय घेणेसाठी दि. ०३/०८/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आला.

दि.१३/०६/२००७ रोजीच्या मंजूर आकृतीबंधात त्वचारोग तज्ञ पदास मंजुरी नसलेने डॉ. कांबळे यांची नेमणूक मानधनावर केलेली होती ती त्यांनी त्यावेळेस स्वीकारलेली आहे. दि.०७/०८/२००९ रोजीच्या आकृतीबंधात

पदाचा समावेश असल्याने त्यांना दि. ०१/०४/२०१० पासून वेतनश्रेणी देणेत आलेली आहे त्यांचे मागणीप्रमाणे त्यांना सुरुवातीचे नेमणूकीपासून वेतनश्रेणी व वार्षिक वेतनवाढ देता येणार नाही.

यावर मा.व्यवस्थापन समितीचे दिं. ०३/०८/२०१४ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.६५१ खालीलप्रमाणे झाला.

डॉ.दादासाहेब लुमा कांबळे, असो. कन्सल्टंट (त्वचारोग तज्ञ) श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि. ०९/०९/२०१२ व दि. २३/०२/२०१३ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या नेमणूकीचे सुरुवातीपासून वार्षिक वेतनवाढ व वेतनश्रेणी मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करणेत आली.

अशाचप्रकारे डॉ.सुभाष श्रीराम शामकुवर व इतर ३ यांनी रुजू झालेल्या तारखेपासून वेतनश्रेणी लागू करणेबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर वेगवेगळे रिट पिटीशन्स दाखल केले होते. त्यामध्ये मा. न्यायालयाने दि.३०.०६.२०१४ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिला.

Respondent No.2 shall decide the representation given by the petitioners with regard to pay scale, expeditiously and on its own merits, within a period of 4 months from today.

मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सदरच्या विषयावर निर्णय घेणेसाठी दि.०६/११/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आला.

महाराष्ट्र शासनाची आकृतीबंधास मंजुरी नसल्याने अर्जदार यांना वेतनश्रेणीत पगार न देता सुरुवातीस मानधन अदा करण्यात आलेले आहे ते आदेश त्यांनी विनातक्रार स्विकारलेले आहेत. शासनाची आकृतीबंधास मान्यता आल्यानंतर मा. व्यवस्थापनाचे निर्णयानंतर अर्जदार यांना वेतनश्रेणीमध्ये वेतन अदा करणेत आलेले आहे. त्यानंतर प्रत्येक वर्षी अर्जदारास वार्षिक वेतनवाढी अदा करणेत आलेल्या आहेत. आकृतीबंधास शासनाची मान्यता नसलेने अर्जदारांना सुरुवातीचे रुजु तारखेपासून वेतनश्रेणीमध्ये वेतन देता येणार नाही अर्जदारांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय झालेला नाही अशाचप्रकारे डॉ. दादासाहेब कांबळे यांनी विनंती अर्ज व रिट पिटीशन नं. ८९११/२०१३ दाखल केले होते. मा.व्य. समितीने दि. ०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६५१ अन्वये त्यांची मागणी अमान्यकरणेत आलेली आहे.

यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६/११/२०१४ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र. ९६८ खालीलप्रमाणे झाला आहे.

प्रस्तावात नमूद केलेल्या श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकडील ४ आरएमओ यांना त्यांचे हजर तारखेपासून वेतनश्रेणी लागू करणेत यावी असे ठरले.

तथापि, रुग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ मध्ये मान्यता मिळालेली असतानासुद्धा निर्णय झालेला आहे, असे दिसते.

समान मागण्या व समान मुद्दा असताना एका प्रकरणात विनंती अमान्य करण्यात आली तर दुस-या प्रकरणात विनंती मान्य करण्यात आलेली आहे. डॉ. दादासाहेब लुमा कांबळे यांनी याकामी पुनःश्च मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर रिट पिटीशन क्र. १०७०८/२०१४ दाखल केलेले आहे. सदर पिटीशन मध्ये मा. न्यायालयासमोर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३.०८.२०१४ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ६५१ नुसार व्यवस्थापनाचे म्हणणे प्रतिज्ञापत्राद्वारे दाखल केलेले आहे. म्हणून दि. ०६.११.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९६८ ची अंमलबजावणी स्थगित केलेली आहे.

त्यानंतर अर्जदार यांनी परत विनंती अर्ज सादर केल्याने याबाबत मा. व्यवस्थापन समितीसमोर ठेवणेसाठी टिपणीसादर केली असतात्यावर तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी यांनी दि. १०/०२/२०१५ रोजी खालीलप्रमाणे निर्देश दिले होते.

"वेतनश्रेणी अस्तित्वात आल्यापासुनच सर्वांना लागू करण्यात आली आहे. अस्तित्वात नसलेली वेतनश्रेणी पूर्वलक्षी लागु करण्याचा प्रश्न उद्भवत नाही अन्य डॉक्टरांना याच नियमाने वेतनश्रेणी लागु करण्यात आली असल्याने यामध्ये कोणतीही विसंगती नाही. सदरची बाब न्यायालयाच्या सविनय निदर्शनास आणण्यात यावी व्य.समितीला सध्या तसदी देण्याची आवश्यकता नाही."

तथापि उपरोक्त निर्देशाप्रमाणे यानंतर कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते. सदरची बाब न्यायप्रविष्ट असल्याने संबंधित कागदपत्रे कामगार वशी ७ब (श्री. धनेश्वर) यांचेकडे होती व त्यावर त्यांचेमार्फत कार्यवाही चालु होती.

त्यानंतर डॉ. सुभाष श्रीराम शामकुवर व डॉ. सुर्यकांत पाटील यांनी पुन्हा मा. अध्यक्ष साहेब श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे दि. १९/०६/२०१५ रोजीचा विनंती अर्ज सादर करुन विषयांकित प्रकरणी निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत विनंती केलेली आहे. सदरच्या अर्जावर मा. अध्यक्ष साहेब यांनी "Medical Director put up in committee" असे निर्देश दिले होते.

उपरोक्त निर्देशास अनुसरुन, मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६/११/२०१४ रोजीचे सभेमध्ये झालेला निर्णय क्र. ९६८ निरस्त करणेबाबत दि. ११/१०/२०१५ व दि. १८/१२/२०१५ रोजी टिपणी सादर करणेत आली होती. त्यानंतर मात्र मा. उपकार्यकारी अधिकारी साहेब व मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी दि. ०५/११/२००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.६६७ ला अनुसरुन काढणेत आलेला आदेश क्र. जा.नं.एसएसएस/ वशी०१/ ७५/२००५ दि. ०७/०१/२००६ ची अंमलबजावणी करणेबाबत समक्ष निर्देश दिले. निर्देशास अनुसरुन दि.

०६/०१/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीनुसार दि. ०६/०१/२०१६ रोजी डॉ. शामकुवर व इतर ३ यांना हजर तारखेपासुन वेतनश्रेणी लागु करणेबाबतचा आदेश पारित करणेत आला.

आता दि. १०/०२/२०१६ रोजीचे पत्रान्वये संस्थान वकील श्री. चौकीदार यांनी डॉ. कांबळे यांचेबाबत ०१ मार्च २०१६ पर्यंत निर्णय घेणेबाबत कळविले आहे.

सबब, उपरोक्त नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता खालील पर्यायावर निर्णय होणेस विनंती.

१. दि. ०५/११/२००५रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ६६७ तसेच त्यास अनुसरुन काढणेत आलेला आदेश क्र. जा.नं.एसएसएस/वशी०१/७५/२००५ दि. ०७/०१/२००६ नुसार दि. ०६/०१/२०१६ रोजीचे आदेशानुसार डॉ. शामकुवर व इतर ३ यांना हजर तारखेपासुन वेतनश्रेणी लागु केली असल्याने डॉ. कांबळे यांनाही हजर तारखेपासुन वेतनश्रेणी लागु करावी. **किंवा**

२. रुग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ व २००९ साली मान्यता मिळाल्याने दि. ०५/११/२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ६६७ निरस्त करणेत यावा. **किंवा**

३. रुग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ व २००९ साली मान्यता मिळाल्याने दि. ०५/११/२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ६६७ बाबत शासनाचे विधी विभागाचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

निर्णय क्र.१८५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०५/११/२००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ६६७ तसेच त्यास अनुसरुन काढणेत आलेल्या जा.नं.एसएसएस/वशी०१/७५/२००५ दि. ०७/०१/२००६ चे आदेशाप्रमाणे दि.०६/०१/२०१६ रोजीचे आदेशानुसार डॉ.शामकुवर व इतर ३ यांना हजर तारखेपासुन वेतनश्रेणी लागु केलेली असल्याने त्याच धर्तीवर डॉ.दादासाहेब लूमा कांबळे यांनाही त्यांचे हजर तारखेपासुन वेतनश्रेणी लागु करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं. ०२ **मे.बी.डी.खैरनार ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंट, या लेखापरीक्षण संस्थेस राजीव गांधी आरोग्य योजनेकरीता पूर्व लेखापरीक्षक म्हणून मुदतवाढ देणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी साठी रुग्णालये विभागाकरीता लेखापरीक्षण कामकाज करणेकरीता पुर्व लेखापरीक्षक म्हणुन मे.बी.डी.खैरनार ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंट या लेखापरीक्षण संस्थेची दि.०१ एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीकरिता नियुक्ती करणेत आलेली आहे.

तसेच मे.बी.डी.खैरनार ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंट या लेखापरीक्षण संस्थेची रुग्णालये विभागाकरीता राजीव गांधी आरोग्ययोजनेकरीता पुर्व लखापरिक्षक म्हणुन दि.०१ फेब्रुवारी २०१५ ते दि.३१ जानेवारी २०१६ या कालावधीकरीता वार्षिक रु.६०,०००/- (सर्व करांसहीत) अशा एकत्रित मानधन तत्वावर नियुक्ती करण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये राजीव गांधी आरोग्य योजनेअंतर्गत उपचार घेणेकरीता संपुर्ण महाराष्ट्रातुन गरीब व गरजु रुग्ण लाभ घेत असल्याने मोठया प्रमाणात रुग्णांची संख्या वाढलेली आहे. राजीव गांधी योजना व दोन्ही रुग्णालयांत दैनंदिन होणा-या आयपीडी/ ओपीडी फाईल्स नियमित पणे तपासणी करणे, गरीब व गरजु रुग्णांना देण्यात आलेली सवलत ही संस्थान व राज्य शासनाचे नियमांनुसार असलेबद्दलची खात्री करणे, बिले रुग्णालयातील दरांनुसार तयार झाल्याची खात्री करणे, राजीव गांधी योजनेसाठी पात्र रुगांच्या फाईल्स परीपुर्ण करुन पाठविल्या जातात, त्याचप्रमाणे त्यांचे बिले मुदतीमध्ये प्राप्त होतात किंवा नाही इ. ची तपासणी त्या-त्या वेळेस झाल्यास संस्थानला वैधानिक लेखापरिक्षात आक्षेप येत नाहीत. यासाठी येथे स्वतंत्र पुर्व लेखापरीक्षकाची आवश्यकता असते.

राजीव गांधी आरोग्य याजनेसाठी नेमलेले पुर्व लेखापरीक्षक मे.बी.डी.खैरनार ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंट या लेखापरीक्षण संस्थेची नेमणुक दि.३१ जानेवारी २०१६ अखेर संपत आहे. यापुढे दि.०१ फेब्रुवारी ते ३१मार्च २०१६ अखेर काळासाठी पुर्व लेखापरीक्षकांची नेमणुक होणे गरजेचे आहे. त्याकरीता रुग्णालये विभागाकरीता नेमणुक केलेल्या पुर्व लेखापरीक्षक यांचे मुदतीप्रमाणे राजीव गांधी आरोग्य योजनेसाठी नेमणुक केलेल्या मे.बी.डी.खैरनार ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंट, नाशिक यांना दि.०१ फेब्रुवारी २०१६ ते ३१ मार्च २०१६ या कालावधीसाठी प्रतिमाह रक्कम रु.५,०००/- येणेप्रमाणे येणा-या एकुण रु.१०,०००/- चे खर्चास मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.१८६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, राजीव गांधी आरोग्य याजनेसाठी नेमलेले पुर्व लेखापरीक्षक मे.बी.डी.खैरनार ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंट या लेखापरीक्षण संस्थेची मुदत दि.३१ जानेवारी २०१६ अखेर संपुष्टात येत असल्यामुळे त्यांना दि.०१ फेब्रुवारी ते ३१मार्च २०१६ अखेर या कालावधीसाठी पुर्वीचेच अटी/ शर्तीवर प्रतिमाह रक्कम रु.५,०००/- मात्र मानधनावर पुर्व लेखापरीक्षक म्हणून नेमणुक करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं. ०३ **आय.टी. मॅनेजर या पदाबाबत.**

प्रस्ताव- **अ)** मंजूर आकृतीबंधानुसार रिक्त कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), यांत्रिकी अभियंता (मेकॅनिकल) माहिती तंत्रज्ञान व्यवस्थापक, इलेक्ट्रॉनिक्स अभियंता, प्रसादालय व्यवस्थापक ही सहा पदे सरळसेवेने भरणेकामी प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेत सादर करण्यात आलेला होता. त्यास

समितीने निर्णय क्र.७५ नुसार सदर प्रस्तावास मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेबाबत निर्देश दिलेले होते.

मा.त्रिसदस्य समितीचे निर्णयानुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन नं.८८४६/२०१४ मान्यतेसाठी दाखल करण्यात आले होते. सदर प्रस्तावास मा.उच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लीकेशन नं.९२१९/२०१४ मध्ये दि.२६/०९/२०१४ रोजी मान्यता दिलेली आहे.

**ब)** दरम्यानचे कालावधीत श्री.किशोर साहेबराव गवळी व श्री.राहुल वामन गलांडे यांनी विनंती अर्ज करुन आय.टी.मॅनेजर या पदावर पदोन्नती मिळणेबाबत विनंती केली. त्यावर आस्थापना विभागाकडून संबंधीत दोनही कर्मचा-यांचा पदोन्नतीचा विषय सादर करुन सदर विषयात यापुर्वी दि.०८/०१/२०१४ रोजी समितीने घेतलेल्या निर्णयात आय.टी.मॅनेजर या पदाचा समावेश असल्याचे नमूद करुन प्रस्ताव निर्णयासाठी मा.त्रिसदस्य समिती दि.१२/०६/२०१४ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.४९१ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"प्रस्तावित कामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले."

**क)** मा.उच्च न्यायालयाने दि.२६/०९/२०१४ रोजी उपरोक्त **"अ"** मध्ये नमुद केलेले सहा पदे सरळसेवेने भरणेस मान्यता दिली. त्यात आय.टी.मॅनेजर या पदाचा समावेश असल्यामुळे मा.त्रिसदस्य समिती दि.१२/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार पुन:श्च मा.उच्च न्यायालयात सदरचा विषय मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला नाही.

मा.उच्च न्यायालयाचे निर्णयानुसार तांत्रिक-अतांत्रिक विभाग प्रमुखांची सहा पदे सरळसेवेने भरणेकामी विविध वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर दि.०१/११/२०१४ व दि.०३-०४/११/२०१४ रोजी जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात आले होते. परंतु जाहिरातीत नमुद केलेली शैक्षणिक पात्रता, कामाचा अनुभव व इतर अटी शर्ती पुर्ण केलेल्या उमेदवारांची संख्या अगदीच कमी असल्याने पुन:श्च जाहिरात देऊन अर्ज मागविणेबाबतचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती दि.२७/१०/२०१५ चे सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.४२६ खालीलप्रमाणे घेतलेला आहे :-

"प्रस्तावात नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, पात्र उमेदवारांची संख्या अगदीच कमी असल्याने मंजुर आकृतीबंधानुसार रिक्त तांत्रिक/ अतांत्रिक विभाग प्रमुखांची सहा पदे सरळसेवेने भरणेकामी पुन:श्च लोकल तसेच राज्यस्तरीय वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली."

**ड)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास शासनाने दि.०७/०८/२००९ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यात खालीलप्रमाणे अटी-शर्ती नमुद केलेल्या आहेत.

अट शर्त क्र.०१) समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

अट शर्त क्र.०२) सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदाची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

अट शर्त क्र.१०) तांत्रिक पदे नव्याने भरताना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

तसेच शासनाने मान्यता दिलेले विनियम संस्थानसाठी दि.०१/०१/२०१५ अन्वये लागू केलेले आहेत. त्यातील सर्वसाधारण सेवा अटी विनियम, २०१३ मधील कलम नं.(२४) पदोन्नती (२) अशी "सर्वसाधारणपणे गुणवत्ता आणि सेवाजेष्ठता हे तत्व पदोन्नतीसाठी लागू करण्यात येते आणि संस्थानाचा कोणताही कर्मचारी जेष्ठतेच्या आधारे पदोन्नतीचा दावा करु शकत नाही." तरतुद आहे.

**इ)** मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे यापुर्वी श्री.अशोक रभाजी औटी, श्री.जयंत विश्वनाथ वझे, श्री.विजय गणपत रोहमारे, श्री.वसंत नाना जेजुरकर यांनी पदोन्नती व उच्च वेतनबॅण्ड मिळणेकामी संस्थान विरुध्द अनुक्रमे रिट पिटीशन क्र.३०५७/२०१३, ३१०२/२०१३, ३१०३/२०१३ व ३१७२/२०१३ इत्यादी याचिका दाखल केलेल्या होत्या. त्यामध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१२/०९/२०१३ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

1. Perused the impugned orders. An officiating arrangement has been made. In any case dispute is about supersession.

2. Alternate and equally efficacious remedy of approaching the Industrial Court under the provisions of Maharashtra Recognition of Trade Unions and Prevention of Unfair Labour Practices Act, 1961 is available to the petitioners.

3. Hence, with liberty to avail that remedy, present petitions stand disposed of with no order as to costs.

त्यानंतर श्री.किशोर साहेबराव गवळी, प्र.आय.टी.विभाग प्रमुख यांनी आय.टी.मॅनेजर या पदावर पदोन्नतीने नेमणूक होणेकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१०८/२०१६ दाखल केलेले आहे.

ई) आता, श्री.किशोर साहेबराव गवळी यांनी मा.त्रिसदस्य समितीचे दि.१२/०६/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.४९१ नुसार आय.टी.मॅनेजर या पदावर पदोन्नती मिळणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन नं.१०८/२०१६ दाखल केलेले आहे. सदर सिव्हील अर्जावर संस्थानचे विधी विभागामार्फत संस्थानचे म्हणणे मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेले आहे.

**श्री.गवळी यांनी दाखल केलेल्या सिव्हील अर्जाचे अनुषंगाने ॲड.संजय आर. चौकीदार, औरंगाबाद यांनी दि.१२/०२/२०१६ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.**

"The aforesaid application was heard today i.e. on 12/02/2016 by Division Bench, Hon'ble Court directed to the Hon'ble committee appointed by court (i.e.The member committee) to take a decision in the first meeting scheduled post the date of order in regard to filling up the post of "I.T.Manager" either by promotion or by nomination by revisiting the entire issue.

Copy of the order in original can be viewed by downloading from the official website of High Court Bombay no sooner it is uploaded.

Please take necessary steps for compliance of the order of Hon'ble High Court."

तसेच मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी श्री.किशोर गवळी यांचे सिव्हील अर्जावर दि.१२/०२/२०१६ रोजी केलेल्या आदेशाची प्रत संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेणेत आलेली असून, त्यामध्ये खालीलप्रमाणे आदेशीत केलेले आहे.

"Mr.Choukidar, the learned counsel submits that, the Committee would revisit the issue about whether to fill in the post of I.T.Manager by promotion or otherwise.

2. Till the respondent/ Committee takes positive decision upon the same, the post of I.T.Manager shall not be filled in by direct nomination.

3. The learned counsel for the Committee submits that, the meeting of the Committee is proposed to be scheduled on 24.02.2016. The decision in respect of filling in the post of I.T.Manager by promotion or otherwise shall be taken by 24.02.2016. In view of that, the civil application is disposed of.

4. In case the decision is not favourable to the applicant, the applicant is at liberty to take further steps."

थोडक्यात, उपरोक्त न्यायालयीन आदेशात असे नमूद आहे की, आय.टी.मॅनेजर हे पद पदोन्नतीने भरावयाचे की सरळसेवेने भरावयाचे याबाबत मा.व्यवस्थापन समितीने पुर्नविलोकन करावे. प्रतिवादी समिती याबाबत जोपर्यंत सकारात्मक निर्णय घेत नाही, तोपर्यंत आय.टी.मॅनेजर हे पद सरळसेवेने भरणेत येऊ नये. याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे नियोजित/प्रस्तावीत दि.२४/०२/२०१६ रोजीचे बैठकीत किंवा तत्पुर्वी निर्णय घ्यावा. तूर्त अर्ज निकाली काढणेत येत आहे. सदर प्रकरणात अर्जदाराचे अनुकूल निर्णय न झाल्यास त्यांना पुढील पावले उचलण्याचे स्वातंत्र्य राहील.

उपरोक्त बाबींचा विचार करता,

१) मा.व्यवस्थापन समिती दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार आय.टी.मॅनेजरसह एकूण ६ पदे थेट सरळसेवा भरती करणेचा निर्णय घेतलेला असून त्यास मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिलेली आहे.

२) मा.व्यवस्थापन समिती व न्यायालयाचे निर्णयानुसार संस्थान प्रशासनाने कार्यवाही सुरू केलेली होती. परंतु पुरेसे पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने पुन:श्च जाहीरात प्रसिध्द करणेबाबत समितीने दि.२७/१०/२०१५ रोजी निर्णय घेतलेला आहे.

३) श्री.गवळी यांनी मा.व्यवस्थापन समिती दि.१२/०६/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.४९१ चा आधार घेऊन संस्थान विरुध्द दिवाणी अर्ज दाखल करुन आय.टी.मॅनेजर या पदावर पदोन्नतीने नेमणूक होणेबाबत अर्ज केलेला आहे.

४) श्री.गवळी यांचे दिवाणी अर्जावर मा.उच्च न्यायालयाने दि.१२/०२/२०१६ रोजी वर नमुद केलेप्रमाणे आदेश दिलेला असून, अर्जदाराबाबत सकारात्मक निर्णय घेऊन आय.टी.मॅनेजर पद पदोन्नती किंवा सरळसेवेने भरावयाचे याबाबत पुर्नविलोकन करुन निर्णय घेण्याचे सूचित केले आहे.

५) मंजुर आकृतीबंधातील अटी-शर्ती व संस्थान अधिनियम, २००४ मधील तरतुदी विचारात घेऊन मंजुर पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आलेले असून ते पूर्व प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. सदरचे सेवाप्रवेश नियम अंतिम करुन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने शासनास सादर करावयाचे आहेत.

६) सदरचे सेवाप्रवेश नियम अंतिम झाल्यानंतर पदांचे संवर्ग, सेवाज्येष्ठता यादी, बिंदु नामावली तयार करणेची कार्यवाही प्रस्तावीत आहे. त्यानंतर निश्चित कोणत्या पदावरुन कोणत्या पदावर पदोन्नती द्यावयाची, सरळसेवा व पदोन्नतीची साखळी इत्यादी बाबी निश्चित होतील.

७) श्री.किशोर साहेबराव गवळी यांची मुळ नेमणूक श्री साईबाबा हॉस्पिटल विभागाकडे ज्यु.ईडीपी मॅनेजर वेतनश्रेणी ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ४२०० या पदावर दि.०६/१२/२००६ पासून करण्यात आलेली आहे. पूर्व प्रसिध्द केलेल्या सेवाप्रवेश नियमात श्री साईबाबा हॉस्पिटलकडील ज्यु.ईडीपी मॅनेजर या पदावरुन ईडीपी मॅनेजर वेतनश्रेणी ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ४४०० या पदावर पदोन्नतीची साखळी दर्शविण्यात आलेली आहे.

८) माहिती तंत्रज्ञान विभागाकडील आय.टी.मॅनेजर हे पद वेतनश्रेणी १५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ५४०० मध्ये मंजुर आहे. पूर्व प्रसिध्द केलेल्या सेवाप्रवेश नियमात आय.टी.विभागाकडील सिस्टीम अॅडमिनिस्ट्रेटर व डाटाबेस अॅडमिनिस्ट्रेटर या पदावर ५ वर्ष सेवा झाल्यानंतर आय.टी.मॅनेजर या पदावर पदोन्नती देता येईल, अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

९) आय.टी.मॅनेजर या पदाचा दि.२८/०१/२०१४ पासून कार्यभार श्री.किशोर गवळी यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे. परंतु पुर्व प्रसिध्द केलेल्या सेवाप्रवेश नियमात ज्यु.ईडीपी मॅनेजर या पदावरुन थेट आय.टी.मॅनेजर या पदावर पदोन्नतीची साखळी दर्शविण्यात आलेली नाही. तसेच आय.टी.मॅनेजर या पदावर पदोन्नती मिळणेबाबत श्री.राहुल वामन गलांडे, प्रोग्रॅमिंग अॅण्ड आय.टी. सुपरवायझर व श्री.विनोद गोवर्धन कोते, ज्यु.ईडीपी मॅनेजर यांनी लेखी अर्जान्वये हरकत घेतलेली आहे.

सबब, वरीलप्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेता, श्री.राहुल वामन गलांडे, प्रोग्रॅमिंग अॅण्ड आय.टी.सुपरवायझर व श्री.विनोद गोवर्धन कोते, ज्यु.ईडीपी मॅनेजर यांनी आय.टी.मॅनेजर या पदावर पदोन्नतीसाठी आमचाही विचार करण्यात यावा, अशी लेखी अर्जान्वये हरकत घेतली आहे.

सर्वश्री. राहुल गलांडे, किशोर गवळी व विनोद कोते यांची वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कर्मचायाचे नांव व मुळ - पदनाम | शैक्षणिक पात्रता | नेमणूक तारीख | सध्याचा वेतनबॅण्ड अधिक ग्रेड पे |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीराहुल वामन गलांडे. प्रोग्रॅमिंग अॅण्ड आय सुपरवायझर.टी. | D.E.C., B.E.(Electronics), M.C.P.Brain Banch Certified, ITIL | २७२००१/१२/ महिना १ वर्षे १४)) | ९३००३४८००- ४६०० + |
| ०२ | श्रीविनोद गोवर्धन कोते. ज्युमॅनेजर.पी.डी.ई. | B.Sc.(Electronics), Dip.in Computer Management, MS-CIT | ०२२००६/०६/ महिने ८ वर्षे ९)) | ९३००३४८००- ४२०० + |
| ०३ | श्री किशोर साहेबराव गवळी. ज्युमॅनेजर.पी.डी.ई. | B.E.(Electronics), M.C.P.Brain Banch Certified, ITIL | ०६२००६/१२/ महिने २ वर्षे ९)) | ९३००३४८००- ४२०० + |

**(१)** वरील तक्त्याचे अवलोकन करता असे निदर्शनास येते की, श्री.राहुल गलांडे व श्री.किशोर गवळी यांची शैक्षणिक पात्रता सारखीच आहे. तसेच श्री.गलांडे हे श्री.गवळी यांना सेवाजेष्ठ आहेत. उपरोक्त तीनही कर्मचा-यांनी आय.टी.मॅनेजर या पदावर पदोन्नती मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्यामुळे श्री.गवळी यांना आय.टी.मॅनेजर या पदावर पदोन्नती देणेकामी सकारात्मक निर्णय घेणे उचित होणार नाही.

**(२)** यापुर्वी मा.व्यवस्थापन समिती दि.०८/०१/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.७५ नुसार आय.टी.मॅनेजर व इतर ५ तांत्रिक/ अतांत्रिक विभाग प्रमुखांची पदे सरळसेवेने भरती करणेबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील सिव्हील अॅप्लीकेशन नं.८८४६ मध्ये दि.२६ सप्टेंबर, २०१४ रोजीचे आदेशान्वये सदरची पदे सरळसेवेने भरणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार विविध वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मांगविण्यात आले होते. परंतु पात्र उमेदवारांची संख्या अगदीच कमी असल्याने सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती दि.२७/१०/२०१५ रोजीचे बैठकीत सादर करण्यात आला असता समितीने निर्णय क्र.४२६ नुसार पुन:श्च जाहिरात देणेचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे पुर्वीचे व्यवस्थापनाचे निर्णय व मा.उच्च न्यायालयाची मान्यता विचारात घेता आय.टी.मॅनेजर व इतर ५ तांत्रिक / अतांत्रिक विभाग प्रमुखांची पदे सरळसेवेने भरता येतील.

**(३)** तसेच उपरोक्त परिच्छेद **"इ"** मध्ये नमुद केलेनुसार, श्री.विजय गणपत रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत विभाग) यांनी **पदोन्नती व उच्च वेतनबॅण्ड** मिळणेकामी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे रिट पिटीशन दाखल केले होते. उपरोक्त परिच्छेद "इ" मध्ये नमुद केलेल्या न्यायालयाच्या आदेशाविरुध्द श्री.रोहमारे यांनी रिव्हीजन अॅप्लीकेशन क्र.१५८/२०१३ व २०/२०१५ असे अर्ज दाखल केले होते. या रिव्हीजन अर्जापैकी १५८/२०१३ मध्ये मा.न्यायालयाने अर्जदारास रिव्हीजन अॅप्लीकेशन करण्याची मुभा देऊन सदरचा अर्ज निकाली काढला होता. तसेच त्यानंतर अर्ज क्र.२०/२०१५ मध्ये मा.उच्च न्यायालयाने 10.This application, being devoid of merit, is therefore, rejected. तसेच 11.Pending civil application, does not survive and hence is disposed of. असा निकाल दिलेला आहे. याचाच अर्थ श्री.रोहमारे यांच्या मुळ अर्जावर न्यायालयाने पुर्वी दिलेला निर्णय (परिच्छेद **"इ"** मधील) कायम ठेवला असे दिसून येत आहे.

आय.टी.मॅनेजर या पदाची मागणी केलेल्या कर्मचा-यांचे सेवाजेष्ठतेचा विचार करता, श्री.किशोर गवळी यांचेबाबत सकारात्मक निर्णय घेतल्यास, त्यांचेपेक्षा सेवाजेष्ठ असलेले श्री.राहुल वामन गलांडे व श्री.विनोद गोवर्धन कोते हे संस्थान व्यवस्थापनाच्या निर्णयाविरोधात मा.न्यायालयात जाण्याची दाट शक्यता आहे. याबाबत श्री.गलांडे व

श्री.कोते यांनी यापुर्वीच संस्थान प्रशासनाकडे लेखी अर्जान्वये हरकत घेतललेली आहे व त्यांचे अर्जावर अलाहिदा स्वतंत्र टिपणी सादर करण्यात आली आहे. श्री.गलांडे व श्री.कोते हे न्यायालयात गेल्यास श्री.गवळी यांचे पदोन्नतीबाबत मोठया प्रमाणावर कायदेशीर गुंतागुंत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व बाबींचा विचार करुन मा.न्यायालयाने दि.१२/०२/२०१६ रोजी श्री.गवळी यांचे दाव्यात दिलेल्या निर्णयानुसार तुर्त आय.टी.मॅनेजर हे पद पदोन्नतीने अथवा सरळसेवा न भरता रिक्त ठेवणे उचित राहील, असे मत आहे.

सबब, उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१८७ **यावर सविस्तर चर्चा होऊन एकमताने असे ठरले की, आय.टी. मॅनेजर या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या संस्थान सेवेतील कर्मचा-यांमधून आय.टी. मॅनेजरची नेमणूक करणेत यावी. तसेच हे पद तांत्रिक स्वरुपाचे असल्यामुळे या क्षेत्रातील तज्ञांस त्रीसदस्यीय समितीच्या अध्यक्ष व सदस्यांसह बोलावून मुलाखती घेऊन, गुणवत्तेने-सेवाजेष्ठता (Merit-cum-Seniority) या तत्वाने योग्य कर्मचा-याची आय.टी.मॅनेजर या पदावर निवड/ नियुक्ती करणेत यावी, सदरहू कार्यवाही दोन महिन्यात पूर्ण करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

विषय नं. ०४ **सन २०१६ मधील उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंदिर परिसरात व इतर ठिकाणी मंडप व्यवस्था करणेकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद**:- अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा,समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"*या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना**:- उन्हाळा सुट्टीच्या कालावधीमध्ये शिर्डी येथे साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होत असते, त्यामुळे उन्हापासून साईभक्तांचे संरक्षण व्हावे याकरीता मंदिर परिसर श्री साईप्रसादालय परिसर, भक्तनिवास (५०० रुम) परिसर व जुने प्रसादालय या ठिकाणी ताडपत्रीचे छतासह कापडी मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**प्रस्ताव**:-

**सन २०१६ मधील उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी करावयाची मंडप व्यवस्था.**

**अ) <u>ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे.</u>**

(कालावधी- दि.०१/०३/२०१६ ते दि.१५/०६/२०१६ अखेर १०७ दिवस)

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडप साईज | चौ. फुट |
|---|---|---|---|
| १ | समाधी मंदिर दक्षिण बाजू मुख्य गेट ते द्वारकामाई १८' उंचीचा | ४३३'x१७'-१०"<br>१५'-३"x१२' | ७७२०.२९<br>१८३.०० |
| २ | गुरुस्थान मंदिर पश्चिम बाजू (दक्षिण उत्तर) १८' उंच | ३७'-४"x४५'-५" | १६९५.५३ |
| ३ | श्रींचे चावडी समोर १८' उंच | ४९'-६"x२६'-६" | १३११.७५ |
| ४ | दर्शनद्वार ते शनिमंदिर गेट | १०६'x२०' | २१२०.०० |
| ५ | शनी, महादेव व गणेश मंदिर समोर १४' उंच | ६१'x३९'-६" | २४०९.५० |
| ६ | समाधी मंदिर उत्तर बाजू ते कॅलेंडर विक्री स्टॉलपर्यंत म्युझियम हॉल समोर - १४' उंच | १००'x१०' | १०००.०० |
| ७ | मारुती मंदिर ते श्यामसुंदर हॉल पर्यंत १४' उंचीचा | ३९'-९" x२१'<br>५७' x२७'-५" | ८३४.७५<br>१५६२.९४ |
| ८ | गेट नं.३ ते श्री मारुती मंदिर. | ५४' x१९' | १०२६.०० |
| ९ | गेट नं.३ समोर | ४५'x२०' | ९००.०० |
| १० | गेट नं.४ चे बाहेरील बाजूने | ६१'-६"x२५'-३" | १५५२.८७ |
| ११ | श्री गुरुस्थान मंदिर दक्षिण बाजूस पुर्व पश्चिम असा. | ६५'x९'-६' | ६१७.५० |
| १२ | गुरुस्थान समोरील बेसमेंट दक्षिण बाजूस (पुर्व पश्चिम असा). | ६५'-७"-६" | ४८७.५० |
| १३ | मंदिर परिसरामध्ये उदी काऊंटर समोर | ४५'x२०' | ९०० |
| १४ | जुने प्रसादालय प्रवेशद्वार (नगर मनमाड फुटपाथ व आतिल बाजूने मोबाईल लॉकर्स पर्यंत.) | ४५'-६"x३०'-६" | १३८७.७५ |
| १५ | दिनदर्शिका विक्री केंद्रासमोर | २०'x१५' | ३०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | दर्शन रांग प्रवेशद्वार व पुर्व बाजूस दक्षिण उत्तर. १४' उंच | ७७' x२९' | २२३३ |
| १७ | दर्शन रांग प्रवेशद्वार पश्चिम बाजूस दक्षिण उत्तर. १४' उंच | ४५'x१५' | ६७५ |
| १८ | श्री साई कॉम्प्लेक्स मधील देणगी काऊंटर बुकस्टॉल समोर. | ६०'x१५' | ९०० |
| १९ | श्री साई प्रसाद निवासस्थान कार्यालयासमोर | ६०'x१५'<br>३२'x८' | ९००<br>२५६ |
| २० | जनसंपर्क कार्यालया समोर | ४०' x१५' | ६०० |
| २१ | दिक्षितवाडा प्रथमोपचार केद्रासमोर | ३०'x१२' | ३६० |
| २२ | श्री दत्त मंदिर समोर | १०१' x३०'-३'' | ३०५५.२५ |
| २३ | ५०० रुम कॅन्टीन समोर तिकीट रिलींग | ४५'x१२'<br>४०' x१२'<br>३०'x१२' | ५४०<br>४८०<br>३६० |
| २४ | श्री साई प्रसादालय येथे श्री साईबाबांचे शिल्पासमोर. | ९०'x२०' | १८०० |
| २५ | श्री साई प्रसादालय गेटपासून बुकींग काऊंटर पर्यंत. | १५०'x२०' | ३००० |
| २६ | पिंपळवाडी रस्ता उत्तर बाजूस फुटपाथवर | ३९४'x७' | २७५८ |
| २७ | नगर – मनमाड रस्ता पुर्व बाजूकडील फुटपाथावर | ३९८'x८' | ३१८४ |
| २८ | जुने प्रसादालय लाडू काऊंटर समोर | ६०'x३०' | १८०० |
| २९ | पिंपळवाडी रोडवर साईकॉम्प्लेक्स समोर | २८६'x१८'-६'' | ५२९१ |
| | | **एकूण चौ. फुट** | **५४,२०२** |
| | **अंदाजे रु.०.२२ प्रती चौ. फुट प्रती दिवसाप्रमाणे येणारा एकूण अपेक्षित खर्च -** | | **१२,७५,९१५/-** |

**ब) एम.एस.पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर असलेले कापडी मंडप उभारणे.**
**(कालावधी** दि.०१/०३/२०१६ ते दि.१५/०६/२०१६ अखेर १०७ दिवस)

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडप साईज | चौ. फुट |
|---|---|---|---|
| १. | समाधि मंदिर उत्तर बाजू चावडीगेट ते नगरद्वार गेटपर्यंत १८' उंचीचा. | २८५'x१८'-६'' | ५२७२ |
| २. | सभाकुंड येथे १८' उंचीचा. | ६१'x६१' | ३७२१ |
| ३. | साई कॉम्प्लेक्स समोरील मोकळया जागेत (१६ आर जागेमध्ये) | १९९'x७८'-५'' | १५६०५.५८ |
| | | **एकूण चौरस फुट** | **२४५९९** |
| | **अंदाजे रु.०.३८ प्रती चौ. फुट प्रती दिवसाप्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च -** | | **१०,००,१९५/-** |

**क) शामियाना मंडप कनात व बिछायतीसह उभारणे.**
**(कालावधी** दि.०१/०३/२०१६ ते दि.१५/०६/२०१६ अखेर १०७ दिवस)

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडप साईज | चौ. फुट |
|---|---|---|---|
| १. | जुने प्रसादालय परिसरातील तिकीट रेलींग समोर | १२०'x४४' | ५२८० |
| २. | सुलभ शौचालयासमोर. | ७५'x४३' | ३२२५ |
| | | **एकूण चौरस फुट** | ८५०५ |
| | **अंदाजे रु. ०.२१ प्रती चौ. फुट प्रती दिवसाप्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च -** | | १९११०७.३२ |
| | **उन्हाळयाचे कालावधीत करावयाचे मंडप व्यवस्थेसाठी येणारा अपेक्षीत अंदाजे खर्च- (अ+ब+क)** | | रु.२४,६७,२१७.०० |

मागील वर्षीचे सन २०१५ मधील उन्हाळयाचे कालावधीत (दि.२७/०४/२०१५ ते दि.१०/०६/२०१५ अखेर ४५ दिवस) साईभक्तांचे साईसाठी मंडप व्यवस्था व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी रक्कम रु.८.६१ लक्ष मात्र खर्च झालेला आहे. सन २०१६ मधील उन्हाळयाचे कालावधीत (दि.०१/०३/२०१६ ते दि.१५/०६/२०१६ अखेर १०७ दिवस) साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व्यवस्था करणेसाठी मागील वर्षीच्या मंजूर दरात १०% वाढ गृहीत धरुन वरील प्रमाणे अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

सन २०१६ मधील उन्हाळयाचे (दि.०१/०३/२०१६ ते दि.१५/०६/२०१६ अखेर १०७ दिवस) कालावधीत साईभक्तांचे सुविधेसाठी मंडप व्यवस्था करणेकामी रु.२४.६७ लक्ष मात्र खर्च येईल. समाधी मंदिर परिसरात मोकळया जागेत एम.एस. स्ट्रक्चर व पी.व्ही.सी. फॅब्रीकचे छत असलेले शेडस् उभारणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे दाखल करणेत आलेल्या Civil Application No.1776/2014 वर मा. उच्च न्यायालय यांनी दि.१४/०१/२०१५ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

"The Present application is rejected because request for permanent M.S. Structure around temple would ruin not only its look but would be obstruction for the devotees. During festival time temporary structures are erected for shed and said practice appears to be proper."

दि.०६/०१/२०१६ रोजी फेर सादर केलेल्या टिपणीवरील निर्देशानुसार "प्रथम मा.त्रिस्तरीय समितीची मान्यता घेण्यात यावी, तसेच मा. समितीसमोर तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात येणा-या मंडपावर वार्षिक खर्च सादर करावा. तसेच Permanent Structure उभारणेबाबतची मा.उच्च न्यायालयाचे आदेश व त्यावर पुढील कार्यवाही काय करावी याबाबतच्या मार्गदर्शनासाठी सविस्तर टिपणी सादर करावी" असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार Permanent Structure उभारणेबाबत स्वतंत्र टिपणी सादर करण्यात येत आहे. तसेच मागील सन २०१४ व २०१५ या आर्थिक वर्षात संस्थानमार्फत साजरे करण्यात येणारे उत्सव तसेच साईभक्तांचे सोयीसाठी उन, वारा, पाऊस यापासून संरक्षण होणेकामी करणेत येणारे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेकामी झालेल्या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे सादर करणेत येत आहे.

**सन २०१४ या वर्षामध्ये झालेल्या मंडप व्यवस्थेचा खर्च.**

| अ.नं. | मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेचा तपशिल | एकूण खर्च रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१ | श्री रामनवमी उत्सव- २०१४ | ७,६३,९५९/- |
| ०२ | उन्हाळी मंडप- २०१४ | १७,६१,९१७/- |
| ०३ | श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१४ | २,५२,५८८/- |
| ०४ | पावसाळी मंडप – २०१४ | ३,७४,२८२/- |
| ०५ | श्री साई सच्चरित पारायण सोहळा – २०१४ | २,८१,३५७/- |
| ०६ | श्री पुण्यतिथी उत्सव- २०१४ | ५,१७,७३६/- |
| ०७ | दिपावली सुट्टयाचा कालावधी- २०१४ | १,४८,९६०/- |
| ०८ | नाताळ– २०१४ | २,४२,९९२/- |
| | **एकूण रक्कम रु.** | **४३,४३,७९०/-** |

**सन २०१५ या वर्षामध्ये झालेल्या मंडप व्यवस्थेचा खर्च.**

| अ.नं. | मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेचा तपशिल | एकूण खर्च रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१ | श्री रामनवमी उत्सव – २०१५ | १३,६५,७७४/- |
| ०२ | उन्हाळी मंडप- २०१५ | ८,६०,७४५/- |
| ०३ | श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१५ | ५,८९,२८७/- |
| ०४ | पावसाळी मंडप – २०१५ | ५,३०,५३६/- |
| ०५ | श्री साई सच्चरित पारायण सोहळा – २०१५ | ३,४४,००१/- |
| ०६ | श्री पुण्यतिथी उत्सव- २०१५ | ४,१५,०२६/- |
| ०७ | दिपावली सुट्टयाचा कालावधी- २०१५ | २,६७,७५६/- |
| ०८ | नाताळ– २०१५ | ३,२७,६४६/- |
| | **एकूण रक्कम रु.** | **४७,००,७७१/-** |

वरील प्रमाणे मंडप व्यवस्था करुन घेणेकामी येणारे एकूण अंदाजे रक्कम रु.२४,६७,२१७/- मात्रचे अपेक्षीत खर्चास व मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगीसाठी दिवाणी अर्ज दाखल करणेस मान्यता मिळणेस तसेच सदरहू काम हे कालमर्यादेचे असल्याने, दरम्यानचे कालावधीत निविदा प्रक्रिया राबविणेसाठी वर्तमान पत्रातील जाहिरातीद्वारे ई– निविदा मागविणे आवश्यक आहे. मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेनंतर ठेकेदार यांना कार्यादेश देता येईल. तरी या कामासाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर निविदा सुचना प्रसिध्द करुन ई– निविदा प्रक्रियेद्वारे निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१८८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६ मधील उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंदिर परिसरात व इतर ठिकाणी मंडप व्यवस्था तसेच इतर अनुषंगीक व्यवस्था करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२४,६७,२१७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज दाखल करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

**तसेच लाडू काऊंटर, द्वारकामाई व साई कॉम्प्लेक्स शेजारील मोकळया जागेत साईभक्तांच्या सोयींसाठी कायमस्वरुपी मंडप टाकणेकामी त्रीसदस्य समिती समोर सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

विषय नं. ०५ **सन २०१६ मधील श्री रामनवमी उत्सवानिमित्त साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी येणा-या अपेक्षित खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा,समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"*च्या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे तर्फे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी गुरुवार दि.१४ एप्रिल, २०१६ ते दि.१६ एप्रिल २०१६ अखेर श्रींचा श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसरात, ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, बॅरेकेटींग, स्टेज, कनात इ. अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच मुंबई येथून पायी पालखी घेऊन येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी खर्डी, गोलभान, कसारा बायपास, लतीफवाडी, घोटी, सिन्नर, खोपडी, पांगरी, वावी, पाथरे, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोण फाटा, झगडेफाटा व निमगांव को-हाळे येथे कापडी / शामियाना मंडप, कनात, बिछाईत व विदयुत व्यवस्थेसह तात्पुरती उभारणी करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

श्री रामनवमी उत्सव २०१६ निमित्त करावयाची व्यवस्थाः- (कालावधी दि.१४/०४/२०१६ ते दि.१६/०४/२०१६ अखेर ०३ दिवस)

**अ) (०१) मंदिर परिसर, साई धर्मशाळा तसेच पालखी स्वागतासाठी करावयाचे मंडप, स्टेज, बॅरेकेडींग इ. व्यवस्था करणे.**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | चौरस फुट | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मंगल कार्यालय, साई धर्मशाळा तसेच पालखी स्वागतासाठी नगरपंचायत व पोलिस स्टेशन जवळ शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह उभारणे, तसेच कुस्ती ग्राऊंडवर शामियाना मंडप उभारणे. | १७,२२०.०० | ७३,८७३.८० |
| २ | साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी ३०x२० साईजचे स्टेज व इतर व्यवस्था करणे. | ६००.०० | ५९,४००.०० |
| ३ | मंदिर परिसरामध्ये सभाकुंड येथे किर्तनासाठी १६x२४ साईजचे स्टेज व इतर व्यवस्था करणे. | ३८४.०० | २५,३४४.०० |
| ४ | दर्शन व भोजन व्यवस्थेसाठी बॅरेकेडींग व्यवस्था | १५००.०० र.फुट | २९,७००.०० |
| | **अ (१) मधील कामासाठी येणारा अपेक्षीत खर्च रक्कम रु.** | | **१,८८,३१८.००** |

**अ (२) मुंबई येथून पायी पालखी घेवून येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी कापडी / शामियाना मंडप, कनात, बिछायत तसेच विद्युतीकरणासह व्यवस्था करणे.**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | चौरस फुट | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई ते शिर्डी मार्गावर खर्डी गोलभान, कसारा बायपास, लतिफवाडी, व घोटी येथे कापडी मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह. | ३१,६०० | दि.०८/०४/२०१६ ते दि.१२/०४/२०१६ अखेर ०५ दिवस. | ९.९८ | ३,१२,८४०/- |
| २ | मुंबई ते शिर्डी मार्गावर सिन्नर, खोपडी, पांगरी व वावी येथे शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह. | ७६,६५१ | दि.०९/०४/२०१६ ते दि.१३/०४/२०१६ अखेर ५ दिवस. | ९.१५ | ४,४०,७४३/- |
| ३ | मुंबई ते शिर्डी मार्गावर पाथरे व पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोनफाटा, झगडेफाटा व निमगांव- को-हाळे येथे शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह. | ३०,३७० | दि.१०/०४/२०२०१६ ते दि.१४/०४/२०१६ अखेर ५ दिवस | ९.१५ | १,७४,६२८/- |
| **अ (२) मधील कामाकरीता येणारा अपेक्षीत अंदाजे खर्च रु.** | | | | | ९,२८,२११/- |
| **श्री रामनवमी उत्सवाकरीता करावयाचे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेसाठी येणारा एकूण अपेक्षीत खर्च रु. (अ)** | | | | | **११,१६,५२९/-** |

**ब) श्री रामनवमी उत्सवानिमित्त करावयाचे इतर अनुषंगीक कामे.**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | उत्सवा निमित्त उभारणेत येणारे डेकोरेशन करीता बांबु.गोल्टे भाडे तत्वावर घेणे. | १०,०००/- |
| २ | उत्सवानिमित्त विविध सुचना बोर्ड व दिशादर्शक फ्लेक्स बोर्ड तयार करणे. | १५,०००/- |
| ३ | उत्सवानिमित्त मंदिर परिसरातील शनिमंदिर, श्री गणेश मंदिर तसेच समाधी मंदिर चावडी व द्वारकामाई मंदिरातील रंगकाम. | १०,०००/- |
| | एकूण रक्कम रु. (ब) | ३५,०००/- |
| | एकूण खर्च (अ+ब) रु. | ११,५१,५२९/- |

उपरोक्तप्रमाणे श्रीरामनवमी उत्सव २०१६ निमित्त साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी एकूण रक्कम रु.११,५१,५२९/- मात्र अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

मागील वर्षाचे सन २०१५ मधील श्रीरामनवमी उत्सव निमित्त साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व्यवस्था व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी रक्कम रु.९,८३,३३५/- मात्र खर्च झालेला आहे. सन २०१६ मधील श्रीरामनवमी उत्सव निमित्त साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी मागील वर्षीच्या मंजूर १०% वाढ गृहीत धरुन वरीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

वरील तक्त्यात नमूद केलेप्रमाणे श्री रामनवमी उत्सव २०१६ निमित्त श्री साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.११,५१,५२९/- मात्र अंदाजे खर्च अपेक्षीत आहे. सदरहू खर्च १० लक्ष पेक्षा जास्त असून, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणे अपेक्षित आहे. त्याकरीता सामान्य प्रशासन विभाग, वशी– ०५ यांचेकडील जा.नं.४०७७/२०१६ दि.२७/०१/२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये श्रीरामनवमी उत्सव– २०१६ गुरुवार दि.१४/०४/२०१६ ते शनिवार दि. १६/०४/२०१६ असा तिन दिवस साजरा होणार असून सदरहू खर्चाचे अंदाजपत्रक सादर करणेबाबत कळविले होते. त्यानुसार त्यांना इकडील विभागामार्फत दि.०१/०२/२०१६ रोजीच्या पत्राने अंदाजे येणा-या रक्कम रु.११,५१,५२९/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करुन देण्यात आलेले आहे. त्यास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेसाठी पुढील कार्यवाही वशी- ०५ मार्फत करण्यात येत आहे. तथापी सदरहू काम हे कालमर्यादेचे असल्याने दरम्यानचे कालावधीत याकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर निविदा सुचना प्रसिध्द करुन ई – निविदा मागविता येतील.

**प्रस्ताव**: तरी वरील प्रमाणे मंडप व्यवस्था करुन घेणेकामी येणारे एकूण अंदाजे रक्कम रु.११,५१,५२९/- मात्रचे अपेक्षीत खर्चास तसेच या कामासाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर निविदा सुचना प्रसिध्द करुन ई – निविदा प्रक्रियेद्वारे निविदा मागविणेस मान्यता मिळणेसाठी विनंती.

निर्णय क्र.१८९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६ मधील श्री रामनवमी उत्सवानिमित्त साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.११,५१,५२९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. श्री रामनवमी उत्सव- २०१६ चे खर्चास मान्यता घेणेकामी मा.औरंगाबाद खंडपीठामध्ये यापुर्वीच संस्थान वकिलामार्फत अर्ज दाखल करणेत आलेला आहे. त्यामध्येच या खर्चाचा समावेश करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाहीः बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

विषय नं. ०६ **शिर्डी येथील सर्व्हे नं.१ मधील दुकानदारांना कॉम्पेनसेशन (नुकसान भरपाई) अदा करणेबाबत.**

प्रस्ताव- १) मौजे शिर्डी येथील स.नं. १ (मंदिर परिसराचे दक्षिणेकडील) पैकी ३० गुंठे जागा शासनाने संस्थानला देण्याचे ठरविले. त्यानंतर त्या जागेतील दुकानदारांनी सन १९७६ साली रे.मु.नं. ६००/७६ सय्यद रतनभाई सय्यद व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन, यांचे विरुध्द दावा दाखल केला. सन १९७४ चे आगोदर पासून या जागेत दुकानदारांची दुकाने आहेत. ग्रामपंचायतीस जागेचा कर दिला जातो व जागा कायदेशीररित्या त्यांचे ताब्यात आहे, त्यांचेकडून जागेचा ताबा घेऊ नये, असे त्यांचे म्हणणे होते. प्रस्तुत दाव्यात संस्थान सामील झाले. मात्र दि. २०/०८/१९७९ रोजी वादी व प्रतिवादी महाराष्ट्र शासन, संस्थान यांचे मध्ये प्रस्तुत जागा व त्यामधील दुकानांचे संदर्भात सुलेनामा करण्यात आला. त्याप्रमाणे सरकारी स.नं. १ मध्ये ४५ दुकानदारांना सर्व्हे नं. १ मध्ये संस्थानकडून दुकाने बांधून देणेत यावीत, वरील मजल्यावर बांधकाम करणेस दुकानदारांची हरकत राहणार नाही. तसेच संस्थानने बांधलेलें सं.नं. १७० मधील ३१ दुकानदारांची सोय होईल व उर्वरीत २५ दुकानदारांना मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत जागा देण्यात येईल अशा आशयाचा सुलेनामा झाला. परंतू सदर ३१ दुकानगाळयांमध्ये दुकानदार गेले नाहीत त्याच प्रमाणे स.नं. १ मध्ये देखील संस्थानकडून दुकाने बांधण्यात आलेली नाहीत. त्यानंतर संस्थानने सुलेनाम्या प्रमाणे अंमलबजावणी व्हावी, यांसाठी कोपरगांव येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात दरखास्त नं. १/१९९० दाखल केली. त्याच प्रमाणे दुकानदारांमार्फत याच सुलेनाम्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी दरखास्त नं. ५/१९९० दाखल करण्यात आली, त्यानंतर शिर्डी येथे नगरपंचायत झाली, डेव्हलपमेंट प्लॅन लागू झाला. जागेवरील आरक्षणाचा विचार करता दुकानदारांचे मागणीचा विचार करता येणार नाही. सुलेनामा निर्रथक झाला आहे. अशी भुमिका संस्थानने दरखास्त क्र. ५/१९९० मध्ये घेतली.

२) शिर्डी नगरपंचायतीला स.नं. १७० जागा विकसीत करावयाची असल्याने ३१ गाळे पाडणेसाठी परवानगी मिळणेसाठी मा. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कडे दरखास्त नं. ५/१९९० मध्ये तसा अर्ज केला, त्याबाबत संस्थानने हरकत घेतली होती. दुकानदारांनी ना हरकत दिली, परंतू मा.कोर्टाने नगरपंचायत अधिनियमा प्रमाणे कार्यवाही करणेस मोकळीक दिली. त्यानंतर नगरपंचायती मार्फत संस्थानने बांधलेले स.नं. १७० मधील गाळे पाडण्यात आले.

उपरोक्त दरखास्त मध्ये सन २००४ मध्ये दुकानदारांनी त्यांची दुकाने काढून टाकू नयेत, असा अर्ज दाखल केला. त्यामध्ये मा. कोर्टाने स.नं. १ मधील ४५ दुकानदारांसाठी पर्यायी जागा दिलेशिवाय काढून टाकता येणार नाही, परंतू ५६ दुकानदारांनी त्यांचेसाठी बांधणेत आलेले गाळे पाडणेस ना हरकत दिली. या कारणाने त्यांचेसाठी सुलेनाम्याची अंमलबजावणीसाठीचा त्यांचा हक्क संपुष्टात आला आहे. अशा अर्थाचा दि. २१/०५/२००४ रोजीचा आदेश केला. सदर निकालाचे नाराजीने रिट पिटीशन नं.३८१३/२००४ तसेच स्पेशल लिव्ह पिटीशन नं. २०९८/२००५ अन्वये संबंधीत दुकानदारांनी मा. सर्वोच्च न्यायालया पर्यंत प्रकरणे दाखल केली, परंतू ते फेटाळणेत आले. प्रस्तुत सर्व्हे नं. १ मधील उर्वरीत ४५ दुकानदारांचे संदर्भात त्यांचे विरुध्द महाराष्ट्र शासनाने रिट पिटीशन नं. ५८३९/२००४ दाखल केले. परंतू मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी मा. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन कोपरगांव यांचेमार्फत मुळ दरखास्तीचे सुनावणी व्हावी, असा निकाल दि. ३१/०७/२००७ रोजी दिला आहे.

मा. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन कोपरगांव यांचे कोर्टात त्यानंतर दोन्ही दरखास्तीची चौकशी झाली, दरखास्त नं. १/९० संस्थानने मागे घेतली तर दरखास्त नं. ५/९० मध्ये दि. ०९/०३/२००९ रोजी मा. कोर्टाने डिक्री एक्झीक्युट होत नसलेबाबत निकाल (दुकानदारांचे विरुध्द) दिला. सदर निकालाचे नाराजीने दुकानदारांनी मा. उच्च न्यायालयात खालील प्रमाणे रिट पिटीशन्स दाखल केले होते.

| अ.क्र. | रिट पिटीशन नं. | वादी / प्रतिवादी |
|---|---|---|
| १ | १७०४/२००९ | चॉदमल गोपाळदास लोकचंदानी विरुध्द महाराष्ट्र शासन व संस्थान |
| २ | १७०५/२००९ | सय्यद रतनभाई सय्यद विरुध्द महाराष्ट्र शासन व संस्थान |
| ३ | २९५२/२००९ | गंगाधर तुरकणे विरुध्द महाराष्ट्र शासन व संस्थान |
| ४ | ५४५१/२००९ | सोमनाथ कोळपकर विरुध्द महाराष्ट्र शासन व संस्थान |

उपरोक्त ४ रिट पिटीशन मध्ये मा.कोर्टाने दि. ०५/०७/२०१० रोजी सर्व्हे नं. १ मध्ये व सर्व्हे नं. १७० मध्ये सुलेनाम्या प्रमाणे दुकानदारांची व्यवस्था करता येणे अशक्य झालेली आहे व सुलेनामा हुकूमनाम्याची अंमलबजावणी होऊ शकत नाही, प्रस्तुतच्या केस मध्ये नगरपंचायतीने बांधलेल्या दुकान गाळयांमध्ये दुकानदारांना गाळे देता येती काय याबाबत तपास करण्यात आला संस्थानने व शासनाने दुकानदारांना दिलेले आश्वासन पुर्तता होणेसाठी काही पर्यायी जागा देता येईल का ? याबाबत मा. जिल्हाधिकारी यांचा अहवाल मागविण्यात आला, प्रस्तुतचे दुकानदार हे अतिक्रमणधारक आहेत, असे शासनाने दाखविण्याचा प्रयत्न केला. परंतू ते अतिक्रमणधारक नाहीत असे मा. कोर्टाचे आदेशात नमुद करणेत आलेले आहे. अर्जदार व सामानेवाले ( दुकानदार व संस्थान व शासन ) या दोन्हींचेही Failure मुळे हुकूमनाम्याची अंमलबजावणी कर्तव्य पार पाडू शकलेले नाही. अर्जदार सामानेवाला यांनी मा. कोर्टाकडे मागणी केलेल्या न्यायदाद व्यतिरीक्त इतर रेलीफ मदत करत नाही. परंतू सदरची केस ही वैशिष्ट्यपुर्ण आहे. व अशा केस मध्ये ऐकमेकास दिलेली अश्वासने कोणीही पाळू शकले नाही. त्यामुळे हुकूमनामा निरर्थक झाला आहे. दुकानांची संख्या त्यांना पर्यायी जागा उपलब्ध होत नसलेची परिस्थीती तसेच सुलेनाम्याची अंमलबजावणी निरर्थक झालेली आहे याचा विचार करता दुकानदारांना योग्य ती नुकसान भरपाईदेणे आवश्यक आहे. यासर्व बाबींचा विचार करता मोठ्या आकाराचे दुकान, हॉटेल्स, स्विटमार्ट, शॉप्स, मोठे दुकाने (१६x११) यांना रक्कम रु. ३,००,०००/- या दराने रक्कम अदा करणे तसेच टप-या, फुल प्रसाद, लहानदुकानांना (११x७) रु. २,००,०००/- निश्चीत करणे योग्य आहे. सदरची रक्कम महाराष्ट्र शासनाने ५०% व संस्थानने ५०% याप्रमाणे सदरची नुकसान भरपाईची रक्कम अदा करावी अशा अर्थाचा निकाल दि. ०५/०७/२०१० रोजी दिला होता.

मा.उच्च न्यायालयाचे आदेशास अनुसरुन तसेच उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर विभाग, श्रीरामपूर यांचे क्र.कावि/३१८५०/२०१० दि. ०६/०८/२०१० चे पत्राने दुकानाचे मोजमाप व मा. कोर्टात जमा करावयाचे रक्कमेच्या माहिती नुसार संस्थानने मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात संस्थानचे हिश्याचे ५०% व शासनाचे हिश्याचे ५०% असे एकुण रु. २,१९,००,०००/- जमा केले होते.

३) मा.उच्च न्यायालयाचे दि. ०५/०७/२०१० रोजीचे आदेशाचे नाराजीने दुकानदारांनी मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एस.एल.पी.नं. २७९८८/२०१०, २८३५८/२०१०, २९६८३-८५/२०१० दाखल केले होते. प्रकरणी मा. कोर्टाने दुकानदारांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देता येते का ? याबाबत विचारणा केली होती. त्यावर संस्थानने दुकानदारांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देता येणार नाही असे शपथपत्र दाखल केले आहे. सदर प्रकरणी मा. कोर्टाने दि. २८/०२/२०११ रोजी खालील प्रमाणे आदेश केला होत.

"As there appears no chances of settlement, the sansthan is permitted to withdraw the amount if any deposited by it before High court. Leave granted the order of status-quo to continue subject to the clarification in favor of the Municipal council made on 13/12/2010 "

सदरचे आदेशास अनुसरुन संस्थानने मा. कोर्टात जमा केलेली रक्कम रु. २,१९,००,०००/- परत घेण्यात आली आहे.

Learned counsel for the petitioners submit that the claim of the Sansthan that alternative land is notavailable is incorrect and that they would like to file a counter to I.A.No.3/2010 pointing out the alternative land that are available and which could be made available. Four weeks' time is granted to the petitioners to file counter to I.A. No.3.

Mr. Shekhar Naphade, learned senior counsel appearing for the Shirdi Municipal Council submits that the Municipal Council is not a party to the consent decree and that the interim order granted by this Court is coming in the way of the Municipal Council taking action for road widening and removing of encroachments etc. in accordance with law.

We make it clear that the interim order of status quo that was granted is with reference to the Sansthan and the State Government. If the Municipal Council wants to take any action in accordance with law in connections with road widening or removal of encroachments, it is made clear that the interim order will not come in the way of such action being taken in accordance with law.

The respondents are permitted to file counter to the I.A. filed by the petitioners within four weeks.

४) उपरोक्त दि. १३/१२/२०१० रोजीचे आदेशानुसार शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी दुकानदारांना दुकाने काढून घेणेबाबत जाहिर नोटीस दिली होती. सदर नोटीसचे विरुध्द दुकानदारांनी मा. सर्वोच्च न्यायालयात सिव्हील अपील नं. ३१५४/२०११, सिव्हील अपिल नं. ३१५५-३१५७/२०११, सिव्हील अपिल नं. ३१५८/२०११ सिव्हील अपिल नं. १४०१७/२०१५ दाखल केले होते. सदरचे अपिलामाध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. २२/०२/२०१६ रोजीचे आदेशात पॅरा नं. ६४ खालील प्रमाणे आहे.

64. It is a matter of record and as has been noted by the High Court, the appellants occupy two categories of plots i.e. 16' x 11' and 7' x 11', where trade/business is being carried on. Though monetary compensation, ipso facto, on a consideration of all attendant factors may not be an exact substitute of the benefits presently enjoyed with the future prospects, we are of the view that, having regard to the permissible ponderables and also the passage of time in between, a lump sum of Rs. 20 lakhs and Rs. 15 lakhs each respectively for the bigger and smaller shops/stalls, as noted hereinabove would be a reasonable palliative to the appellants. We order accordingly. It is reiterated that the compensation, as indicated hereinabove, would be payable to the appellants only if an alternative site is not feasible. The entire process on both counts, however should be completed within a period of six weeks herefrom. The State Government and the Sansthan would bear the amount of compensation, payable in equal shares and would deposit the same in the Bombay High Court within the period of six weeks aforementioned. The amount already deposited by the Sansthan in terms of the High Court's order, if not withdrawn, shall be adjusted against this amount. The allotment of the new site/deposit, as directed, would be a condition precedent for further action in terms of the impugned notice. It is also ordered that on the deposit being made with the High Court, the Registrar General of the High Court would make suitable arrangements for disbursement thereof to the appellants as due to them, as expeditiously as possible, however on proper identification.

सदर प्रकरणी मा. कोर्टात संस्थानने दुकानदारांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देता येत नसल्याबाबत शपथपत्र दाखल केलेले असल्याने मा. कोर्टाचे आदेशानुसार दुकानदारांना पर्यायी जागा देणेबाबत विचार करता येणार नसल्याने मा. कोर्टाचे आदेशानुसार दुकानदारांना नुकसान भरपाईची रक्कम अदा करावी लागणार आहे. यापुर्वी मा. उच्च न्यायालयाचे आदेशा नुसार दुकानदारांना अदा करावयाची नुकसान भरपाईची रक्कम ठरविणे कामी मा. जिल्हाधिकारी यांचे सुचने नुसार उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर विभाग, श्रीरामपूर यांनी क्र.कावि/३१८५०/२०१० दि. ०६/०८/२०१० चे पत्राने मा. जिल्हाधिकारी यांना दिलेली दुकानाचे मोजमाप व मा. कोर्टात जमा करावयाचे रक्कमेच्या माहिती नुसार आता जमा करावयाची रक्कमेच्या हिशोबानुसार एकुण १०१ दुकान दारांपैकी १७ दुकाने मोठ्या स्वरुपाची (१६x११) यांना प्रत्येकी रक्कम रु. २०,००,०००/- या दराने रक्कम रु. ३,४०,००,०००/- , तसेच ८४ लहान दुकाने (११x ७) प्रत्येकी रक्कम रु. १५,००,०००/- याप्रमाणे रक्कम रु. १२,६०,००,०००/- असे एकुण १०१ दुकानदारांना द्यावयाची नुकसान भरपाईची रक्कम रु. १६,००,००,०००/- (अक्षरी रु. सोळा कोटी मात्र) या रक्कमे पैकी संस्थानचे हिश्याची ५०% रक्कम रु. ८,००,००,०००/- (अक्षरी रु. आठ कोटी मात्र ) मा. मुबंई उच्च न्यायालयात जमा करावी लागणार आहे.

याबाबत दि.२५/२/२०१६ रोजी संस्थानचे सदर प्रकरणी ॲड श्री खर्डे साहेब हे मा.सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशाबाबत, मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करणेकामी व मा.सुप्रीम कोर्टाचे

आदेशाची अंमलबजावणीची कार्यवाही तातडीने करणेबाबत माहिती देणेसाठी शिर्डी येथे समक्ष आले असता, त्यांनी मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे कक्षात याबाबत सविस्तर चर्चा करणेत आली. मा.उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी, उपकार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, विधी अधिकारी हजर होते.

ॲड. श्री खर्डे यांनी उपरोक्त प्रकरणी मा.सुप्रीम कोर्टाने सर्व याचीकांचा निकाल एकत्रित निकाल दिलेला असुन, एकुण ५६ + ४५ अशा १०१ दुकानदारांना नुकसान भरपाई द्यावी लागणार असल्याचे सुचित केले आहे.

सदरची रक्कम अदा करणेपुर्वी मा.व्यवसथापन समितीची व दि.१६/१०/२०१२ रोजीचे मा.उच्च न्यायालयाचे आदेशा नुसार मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घ्यावी लागणार आहे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१९० **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे दुकानदारांनी एस.एल.पी.नं.२७९८८/ २०१०, २८३५८/ २०१०, २९६८३/ २०१० दाखल केले होते. तसेच त्यामध्ये दुकानदारांनी सिव्हील अपील नं. १४०१६/ २०१५, १४०१७/ २०१५, ३१५४/ २०११, ३१५५-३१५७/ २०११, ३१५८/ २०११ दाखल केलेले होते.**

**त्यामधील दि.२२.०२.२०१६ रोजीचे मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशान्वये संबंधीत अपीलकर्त्या दुकानदारांना दि.०५.०३.२०१६ रोजी प्रांताधिकारी, शिर्डी यांनी संस्थान मालकीच्या जागा वगळता शासनाच्या उपलब्ध असलेल्या जागा दाखवाव्यात. प्रांताधिकारी, शिर्डी यांनी प्रस्तावीत केलेल्या जागा दुकानदारांना योग्य न वाटल्यास किंवा त्यांनी नाकारल्यास, दुकानदारांना संस्थानतर्फे द्यावयाची ५०% नुकसान भरपाईची रक्कम मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये भरणा/ जमा करावी.**

**तसेच शासनाने भरावयाची उर्वरित ५०% नुकसान भरपाईची रक्कम शासनाकडून विहीत मुदतीमध्ये उपलब्ध होऊ शकत नसल्यास व शासनाने सदरहू रक्कम, संस्थानला परत देणेचे अटीवर पत्राद्वारे लेखी कळविल्यास, शासनाचे हिस्स्याची ५०% नुकसान भरपाईची रक्कम सुध्दा संस्थानमार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये विहीत मुदतीमध्ये भरणा/ जमा करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी/ मुख्यलेखाधिकारी/ प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)

---

विषय नं. ०७ **जनहित याचीका क्र.२५/२०१२ मधील चौकशी अधिकारी श्री.पी.एस.परांजपे साहेब यांनी केलेल्या चौकशीचे अहवालाबाबत.**

निर्णय क्र.१९१ **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

विषय नं. ०८ **सन २०१६-१७ या वर्षासाठी उदी चाळणे दराचे मंजूरीबाबत.**

प्रस्ताव- श्रीसाईबाबा हयात असतांना द्वारकामाई धुनीमध्ये तयार झालेली उदी साईभक्तांना प्रसाद म्हणून स्वहस्ते वाटत असे. तीच पद्धत श्रीसाईबाबांचे निर्वाणानंतर चालू ठेवण्यात आलेली आहे. श्रीसाईबाबांचे निर्वाणानंतर सदर पवित्र उदी चाळण्याचे काम श्रीमती पार्वताबाई चंद्रभान भालेराव, रा.शिर्डी या करीत होत्या. त्या वयोवृद्ध झाल्यामुळे सन-१९९४ पासून त्यांच्या सुनबाई सौ.मिराबाई विठ्ठल भालेराव, रा.शिर्डी या उदी चाळण्याचे काम करीत आहेत. एकंदरीत सुमारे ८२ ते ८३ वर्षापासून उदी चाळण्याचे काम शिर्डीतील भालेराव कुटूंब उक्ती मजूरी पद्धतीने काम करीत आलेले आहे.

उदी चाळण्याचे काम अत्यंत अत्यंत त्रासाचे असून उदी चाळतांना नाका-तोंडात उदीचे अतिशय बारीक कण जातात. असे कठीण काम सदर कुटूंब गेल्या ८२-८३ वर्षांपासून करीत आहे. प्रतिदिन २॥ ते ३ गोण्या उदी चाळण्यात येते. प्रति महिन्यामध्ये साधारणत: ७५ ते ७८ गोण्या चाळणेचे काम करत आहेत. माहे-एप्रिल-२०१५ ते माहे-मार्च-२०१६ या कालावधीत उदी चाळणेकामी जा.नं.एसएसएस/वशी-०१/९२/२०१५,दि.०३/०४/२०१५अन्वये प्रति गोणी रु.२००/- प्रमाणे मजूरी देण्यात आलेली आलेली आहे. माहे-मार्च-२०१६ अखेर सदर मंजूरी संपणार आहे. करिता सौ.मिराबाई विठ्ठल भालेराव यांनी दि.०२ फेब्रुवारी,२०१६चे अर्जान्वये पुढील वर्षाकरिता आहे त्याच दरामध्ये (रु.२००/- प्रति गोणी) उदी चाळण्याचे काम मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

सन २०१५-१६मध्ये माहे-एप्रिल-२०१५ ते माहे-जानेवारी-२०१६ अखेर एकूण ७४१ गोणी उदी चाळण्यात आलेली असून प्रती गोणी रु.२००/- प्रमाणे एकूण रक्कम रु.१,४८,२००/- इतकी मजूरी आदा करण्यात आलेली आहे. सन-२०१६-१७ मध्ये अंदाजे १०००-१२०० गोणी चाळण्याकरिता प्रति गोणी रु.२००/- प्रमाणे अंदाजे एकूण रु.२,००,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी सौ.मिराबाई विठ्ठल भालेराव यांना उदी चाळणीचे आहे त्याच दरामध्ये (रु.२००/- प्रति गोणी) माहे-एप्रिल-२०१६ ते माहे-मार्च-२०१७ अखेर या कालावधीसाठी काम देणेकरिता सदर प्रस्तावास मान्यता मिळणेकामी निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णय क्र.१९२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सौ.मिराबाई विठ्ठल भालेराव यांना एप्रिल-२०१६ ते माहे-मार्च-२०१७ अखेर या कालावधीसाठी उदी चाळणेचे काम पुर्वीचेच अटी/ शर्तीवर प्रती गोणी रु.२००/- मात्र या दराने देणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं. ०९** **फुटाणे प्रसाद, विडयाची पाने, मूर्ती व गोवरी खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर विभागाकरीता प्रति वर्षाप्रमाणे खालील साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे-

अ) मंदिर विभागात श्रींचे धुपारतीनंतर दर शुक्रवारी एकादशीचे दिवस वगळता फुटाण्याचा प्रसाद वाटण्यात येतो. सन २०१५-१६ करीता स्थानिक फुटाण्याचे व्यापारी यांचेकडुन दर शुक्रवारी ९ किलो फुटाणे मंजूर न्युनतम दराने खरेदी करण्यात येत आहे. माहे मार्च-२०१६ अखेर सदर फुटाणे खरेदीची मुदत संपणार आहे. माहे एप्रिल-२०१६ ते माहे-मार्च-२०१७ अखेर या आर्थिक वर्षात प्रसादासाठी एकादशीचे दिवस वगळता दर शुक्रवारी ९किलो प्रमाणे अंदाजे वार्षिक खरेदीत ४५०किलो फुटाणे खरेदी करणे आवश्यक आहे. माहे-एप्रिल-२०१५ ते माहे-डिसेंबर-२०१६ या कालावधीत एकूण ३३३ किलो फुटाणे प्रसाद खरेदी करण्यात आले असून त्यासाठी एकूण रु.९७६५/- मात्र खर्च झालेला आहे. तसेच पुढील वर्षाकरीता समाधी मंदिराचे बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

ब) श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत भक्तांकरीता मंदिर परिसरामध्ये दररोज श्रीसाईसत्यव्रत पूजा व भक्त अभिषेक पूजा करण्याची सुविधा आहे. प्रत्येक सत्यनारायणाच्या पूजेकरीता पूजेच्या चौरंगावर दोन विड्याची पाने ठेवावी लागतात. करीता स्थानिक दुकानदार यांचेकडुन प्रति शेकडा प्रमाणे मंजूर न्युनतम दराने विड्याची पाने खरेदी करण्यात येतात. माहे-मार्च-२०१६ अखेर याची मुदत संपणार आहे. त्याकरीता माहे-एप्रिल-२०१६ ते माहे-मार्च-२०१७ अखेर या आर्थिक वर्षात सत्यनारायण पूजेकरीता विड्याची पाने खरेदी करावी लागणार आहेत. तसेच अभिषेक पूजा चौरंग मांडणी करुन सत्यनारायण पूजेप्रमाणे करणे प्रस्तावित असल्याने भक्त अभिषेक पुजेकरीताही विड्याची पाने खरेदी करावे लागणार आहेत. श्रीसत्यनारायण पूजेकरीता माहे-एप्रिल-२०१५ ते माहे-डिसेंबर-२०१५ अखेर या कालावधीत एकूण ९०८४२ नग विड्याची पाने लागली असून त्याकरीता एकूण रु.५६,२०५/- मात्र खर्च झालेला आहे. तसेच पुढील वर्षाकरीता समाधी मंदिराचे बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

क) श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातुन अनेक सन्माननीय व्यक्ती येत असतात. या मान्यवर अतिथींचा संस्थानचे वतीने यथोचित सत्कार करण्यात येतो. सत्कारामध्ये मा.अध्यक्ष सो, मा.उपाध्यक्ष सो, मा.विश्वस्त मंडळ, मा.कार्यकारी अधिकारी सो, मा.उपकार्यकारी अधिकारी सो, मा.प्रशासकीय अधिकारी व जनसंपर्क अधिकारी यांचे सुचनेनुसार मान्यवरांना आवश्यकतेप्रमाणे पावडर मार्बल मूर्ती देण्यात येते. तसेच संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त होणारे कर्मचा-यांना संस्थानमार्फत पावडर मार्बल मूर्ती देऊन सत्कार करण्यात येते. त्याकरीता आवश्यकतेप्रमाणे पावडर मूर्ती नंबर ३, मूर्ती नंबर ४, मूर्ती नंबर ५ अशा पावडर मूर्ती मागविण्यात येतात. माहे-मार्च-२०१६ अखेर मुर्ती खरेदीची मुदत संपणार आहे. त्यामुळे माहे-एप्रिल-२०१६ ते माहे-मार्च-२०१७ या आर्थिक वर्षाकरीता पावडर मार्बल मूर्तीचे दरपत्रके मागविणे आवश्यक आहे. माहे-एप्रिल-२०१५ ते माहे-डिसेंबर-२०१५ अखेर या कालावधीत एकूण ३ नंबर मूर्ती वापरण्यात आलेल्या नाही, ४ नंबर मूर्ती २३ नग, ५ नंबर मूर्ती ०९ नग खरेदी करण्यात आलेल्या आहेत व त्यासाठी एकूण रु.७,१८०/- मात्र खर्च झालेला आहे. तसेच पुढील वर्षाकरीता समाधी मंदिराचे बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

ड) मा.महामहिम राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती, सर्व राज्याचे मा.मुख्यमंत्री महोदय, मा.सुप्रिम कोर्ट व इतर कोर्ट, मा.खासदार किंवा व्ही.व्ही.आय.पी. व इतर तत्सम महत्वाचे व्यक्ती मंदिरात दर्शनासाठी येत असतात. त्यांचा संस्थानचे वतीने शॉल, श्रीफळ, देऊन यथोचित सत्कार करण्यात येतो. काही व्यक्तींना वेळप्रसंगी प्युअर मार्बल मूर्ती संस्थानमार्फत भेट म्हणून देण्यात येते. ती ऐनवेळी शिर्डीतील स्थानिक मार्केटमधुन थेट खरेदी करण्यात येते. अशा प्युअर मार्बल मूर्ती आवश्यकतेप्रमाणे थेट खरेदी कराव्या लागतात त्याची संख्या निश्चित नसते. सन-२०१५-१६ या वर्षामध्ये प्युअर मार्बल मूर्ती व पावडर मार्बल मूर्ती खरेदी करण्यासाठी एकत्रीत रु.४,००,०००/- (अक्षरी चार लाख मात्र) ची तरतूद करण्यात आलेली होती परंतु, प्युअर मार्बल मूर्ती खरेदी करण्यासाठी प्रत्यक्ष खर्च झालेला नाही. तरी सन-२०१६-१७ या वर्षाकरीता अंदाजे रक्कम रु.१,००,०००/- खर्च अपेक्षीत आहे. तरी आवश्यकतेप्रमाणे प्युअर मार्बल मूर्ती थेट खरेदी करणेस व त्याकामी होणारे खर्चास मान्यता असावी. तसेच सदर बीलाची रक्कम लेखाशाखेमार्फत अदा होणेस मान्यता असावी, ही विनंती.

इ) श्रीसाईभक्तांना पवित्र उदीचे वाटप करण्यासाठी मंदिर विभागामार्फत प्रतिवर्षी श्रींचे द्वारकामाई धुनीकरीता गोवरी खरेदी करावी लागते. मागील वर्षी सन-२०१५-१६ करीता एकूण १,१०,०००किलो रानशेणी व २०,०००किलो थापील गोवरीकरीता कोटेशन मागविण्यात आलेल्या होते. मार्च-२०१६ अखेर या गोवरीची मुदत संपणार आहे. परंतु, पुरवठादार यांना आदेश दिल्यानंतर पावसाळा सुरु झाला व गेली ६महिने गोवरी पुरवठा झालेला नाही. त्यामुळे पुरवठादारांकडुन माहे डिसेंबर-२०१५ पासुन गोवरी पुरवठा सुरु झाला आहे. त्यापैकी त्यांनी माहे-डिसेंबर-२०१५ अखेर १३,८९५ किलो रानशेणी गोवरी पुरविलेली आहे व उर्वरीत माहे-मार्च अखेर पुरविणार आहे. त्यामुळे पुढील वर्षी एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७ अखेर फक्त एकूण १,००,००० किलो रानशेणी गोवरी खरेदी करावी असे नम्र मत आहे. त्यासाठी अंदाजे रक्कम रु.७,५०,०००/- खर्च अपेक्षीत आहे. सदर निविदाप्रक्रीया खरेदी विभागामार्फत ई-टेंडर प्रक्रीयेद्वारे करणेस मान्यता असावी. तसेच गोवरी खरेदीकामी होणा-या खर्चास मान्यता असावी. त्याकामी मंदिर विभागाचे बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

तरी खालीलतपशीलाप्रमाणे सन-२०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता साहित्य खरेदी करावे लागणार आहे-

| अक्र. | तपशील | एप्रिल-ते डिसें १५-१५ खर्च | सन ची१७-१६- आवश्यकतेनुसार मागणी (अंदाजे) | अंदाजे दर | | | अंदाजे खर्च रुपये | एकूण अंदाजे खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रुपये | पैसे | प्रमाण | | |
| ०१ | फुटाणे प्रसाद | ३३३ किलो | ४५० किलो | ६० | ०० | किलो | २७,०००/- | २७,०००/- |
| ०२ | विड्याची पाने | ९०८४२ नग | ३,००,००० नग | ०० | ७० | नग | २,१०,०००/- | २,१०,०००/- |
| ०३ | पावडर मूर्ती नं.३ | ०० | ५० नग (आवश्यकतेप्रमाणे) | १५० | ०० | नग | ७५००/- | १,०२,५००/- |
| | पावडर मूर्ती नं.४ | २३ नग | २०० नग (आवश्यकतेप्रमाणे) | २०० | ०० | नग | ४०,०००/- | |
| | पावडर मूर्ती नं.५ | ०९ नग | १०० नग (आवश्यकतेप्रमाणे) | ५५० | ०० | नग | ५५,०००/- | |
| ०४ | प्युअर मार्बल मूर्ती | ०० | आवश्यकतेप्रमाणे | | | | | १,००,०००/- |
| ०५ | रानशेणी गोवरी | १३८९५ किलो | १,००,००० किलो (आवश्यकतेप्रमाणे) | ८ | ०० | किलो | ८,००,०००/- | ८,००,०००/- |

तरी उपरोक्त नमूद केल्यानुसार प्रति वर्षाप्रमाणे माहे एप्रिल-२०१६ ते माहे मार्च-२०१७ अखेर या आर्थिक वर्षामध्ये वरील अ.क्र.०१,०२,०३ व ०५ चे साहित्याकरीता निविदा प्रक्रीयेद्वारे दरपत्रके मागवुन न्युनतम दरास मंजूरी देणेस व अ.क्र.०४चे प्युअर मार्बल मुर्ती आवश्यकतेप्रमाणे थेट खरेदी करणेस मान्यता असावी. उपरोक्तप्रमाणे साहित्य खरेदीकामी होणा-या खर्चास मान्यता असावी. त्याचप्रमाणे वरील नमूद केलेले रानशेणी गोवरी खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रीयाद्वारे खरेदी करणेस मान्यता असावी. तरी खरेदीप्रक्रीया करणेकामी व खर्चाकामी मान्यता असावी ही विनंती.

निर्णय क्र.१९३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल- २०१६ ते मार्च- २०१७ या कालावधीसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फुटाणे प्रसाद, विडयाची पाने व पावडर मूर्ती इ. खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेत यावे. तसेच प्युअर मार्बल मुर्ती आवश्यकतेनुसार थेट खरेदी करणेत यावी. उर्वरित रानशेणी गोवरी खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले.**

**तसेच याकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग)

---

विषय नं. १० **कुंभमेळा- २०१५ चे कालावधीत खरेदी करण्यात आलेले सुरक्षा साहित्यापैकी फोटो कॅमेरे खरेदीकामी आलेल्या जादा खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- कुंभमेळा गर्दीचे नियोजनकामी पोलिस अधिक्षक अहमदनगर यांनी सुरक्षा साहित्य मिळणेबाबत इकडील कार्यालयास कळविले होते. कुंभमेळा कक्ष विभागामार्फत संस्थानचे विविध विभागांचे होणारे रु.57,54,80,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन नं.3500/2015 दाखल करण्यात आले होते. त्यावर मा.उच्च न्यायालय यांनी दि.06/05/2015 रोजी दिलेल्या आदेशान्वये सुरक्षा साहित्य खरेदीकामीच्या रु.28,16,04,400/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. मा.व्यवस्थापन समिती दि.04/07/2015 चे सभेमध्ये कुंभमेळयानिमीत् लागणारे आवश्यक सुरक्षा साहित्य् खरेदी करणेकामी प्रक्रिया सुरु करणेस मंजुरी मिळणेबाबत विषय नं.03 प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.196 खालीलप्रमाणे झालेला आहे.

उपरोक्त प्रस्तावातील यादीतील सुरक्षा साहित्य खरेदीबाबत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

1) अ.नं.1 ते 28 हे साहित्य खालील यादीमध्ये दिलेल्या तपशिलाप्रमाणे खरेदी करणेकामी तातडीने जाहीरात प्रसिध्द करणेत येऊन, ई-निवीदा मागविणेत याव्यात.
2) अ.नं.29 ते 46 हे साहित्य खरेदी करणेकामी लिमिटेड टेंडर (PSU) प्रक्रिया राबविणेत यावी.
3) अ.नं.47 ते 49 संस्थानमार्फत उपलब्ध् करुन देण्यात यावे.
4) अ.नं.50 ते 54 हे साहित्य शासनाच्या मंजुर दर करारानुसार खरेदी करणेत यावे.
5) अ.नं.55 ते 56 हे साहित्य भाडोत्री तत्वावर उपलब्ध करुन देण्यात यावे.
6) अ.नं.24 फोटो कॅमेरा खरेदीकामी निवीदेमध्ये योग्य दर न मिळाल्यास रु.50,000/- मात्र खर्चास अधीन राहून खरेदी करणेत यावे, असे ठरलेले आहे.

सुरक्षा साहित्य खरेदीकामी सी.सी.टी.व्ही. विभागामार्फत ई-निवीदा प्रक्रिया राबवुन न्युनतम दर असलेले निवीदाधारक यांना सुरक्षा साहित्य् पुरविणेकामी कार्यादेश देण्यात आलेले आहेत. जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्ही सेल/ 3071/2015 दि.28/08/2015 नुसार मे. युनीक डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि. पुणे यांना सुरक्षा साहित्य् पुरविणेकामी दिलेल्या कार्यादेशामध्ये 08 मेगा पिक्सलचे 10 नग फोटो कॅमेरे पुरविणेबाबत नमुद आहे. परंतु पुरवठादार यांनी 08 मेगा पिक्सलऐवजी जादा क्षमतेचे म्हणजेच 12 मेगा पिक्सलचे कॅमेरे पुरविलेले आहेत. त्याकामी खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

| अनं | तपशिल व बील नंबर | नग | प्रतिनग दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 01. | फोटो कॅमेरा (12 मेगा पिक्सल) | 10 | 5,375/- | 53,750.00 |
| | | +व्हॅट 12.5% | | 6,718.75 |
| | | | एकुण रुपये = | 60,468.75 |
| | | | पुर्णांकित रुपये = | 60,469.00 |

अक्षरी रु. साठ हजार चारशे एकोणसत्तर मात्र.

फोटो कॅमेरे खरेदीकामी प्रत्यक्ष झालेला खर्च रक्कम — रु. 60,469/-

मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेली रक्कम — रु.50,000/-

व्यू.स.चे मंजुरीपेक्षा जादा खर्च झालेली रक्कम — रु.10,469/-

तरी कुंभमेळा 2015 चे कालावधीत 10 नग फोटो कॅमेरे खरेदीकामी मा.व्यवस्थापन समितीचे मंजुर रक्कमेपेक्षा ई-निवीदा प्रक्रिया राबवुन जादा खर्च झालेले रु.10,469/- (अक्षरी रु. दहा हजार चारशे एकोणसत्तर मात्र) चे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.११४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, कुंभमेळा- २०१५ चे कालावधीत खरेदी करण्यात आलेल्या सुरक्षा साहित्यांपैकी फोटो कॅमेरे खरेदीकामी आलेल्या रु.१०,४६९/- मात्रचे जादा खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

विषय नं. ११ **पाणी टंचाई कालावधीत संस्थान मान्य दराने नविन भक्तनिवास (५०० रुम्स) साईआश्रम भक्तनिवास (१००० रुम) दि.१३/०१/२०१६ ते दि.१४/०१/२०१६ व साईप्रसाद इमारत ०१ व ०२ करीता दि.१२/०१/२०१६ ते दि.१४/०१/२०१६ या कालावधीत भाडोत्री टँकर धारकांकडून पाणी पुरवठा उपलब्ध करुन घेणेस व त्यासाठी आलेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-** अधिनियम कलम 21 मधील पोट-कलम (1) च्या खंड (क) अन्वये "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे " अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मौजे कनकुरी येथील ३३२ एम.एल. क्षमतेच्या साठवण तलावास ५०० मायक्रॉन जाडीचे HDPE Geomembrane Sheet टाकणेचे कामास माहे नोव्हेंबर-डिसेंबर २०१५ मध्ये सुरुवात करणेत आलेली होती. त्यातच नाताळ उत्सव कालावधीत श्री क्षेत्र शिर्डी येथे श्रीसाईचे दर्शनासाठी मोठया प्रमाणावर भाविकांची गर्दी झाली. दरम्यानचे कालावधीत पाटबंधारे विभागाकडुन पाण्याचे आवर्तन (रोटेशन) न आल्याने संस्थानचे साठवण तलावातुन संस्थान परिसरास पाणी पुरवठा करणेसाठी मोठया प्रमाणावर अडचणी निर्माण झाल्या. साईभक्तांना पाणी उपलब्ध करुन देणेसाठी पाणी वितरण व्यवस्थेवर मोठया प्रमाणावर ताण पडला.

साईभक्तांसाठी तातडीने पाणी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने पाणी पुरवठा विभागाकडुन भाडोत्री टँकर लावणेस, त्यासाठी येणारे अंदाजे रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी व भाडोत्री टँकरधारकांचे दर निश्चित करणेचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांना मिळणेसाठी मा.त्रिसदस्यीय समितीचे मान्यतेस प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.२८/१२/२०१५ रोजीचे सभेत सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली होती.

कोपरगांव येथील श्री वाल्मिकराव कातकडे यांनी संस्थानकरीता पाणी वाहतुक करणेसाठी २ ट्रक टँकर व श्री.राजेंद्र जगताप, शिर्डी यांचेकडुन १ ट्रॅक्टर टँकर विनामुल्य उपलब्ध झालेले होते. सदर टँकरकरीता डिझेलची व्यवस्था संस्थानचे वाहन विभागाकडुन उपलब्ध करणेत येवून त्याव्दारे पाणी वाहतुक सुरु करण्यात आली. सदरची व्यवस्था अपुरी पडल्याने भाडोत्री टँकरव्दारे तातडीने पाणी उपलब्ध करुन घेणे आवश्यक असल्याने मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.२८/१२/२०१५ रोजीचे निर्णयास अनुसरुन तसेच दि. २९/१२/२०१५ रोजीचे टिपणीवरील सुरुवातीस ३ लाख रुपये खर्च करणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी रक्कम मंजुर करुन कोटेशन मागविणेचे कार्यवाहीस दिलेल्या मान्यतेस अनुसरुन संस्थान परिसरास भाडोत्री टँकरव्दारे पाणी पुरवठा करुन घेणेसाठी तातडीने कार्यवाही करुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. याकामी रु. ०.१३ प्रती लिटर याप्रमाणे निम्नतर दर प्राप्त झालेने भाडोत्री टँकरधारकांकडुन रु.०.१३ प्रती लिटर या दराने संस्थानकरीता पाणी उपलब्ध करुन घेणेत आले.

**प्रस्ताव:-** जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन पाण्याचे आवर्तन (रोटेशन) न आल्याने व संस्थान साठवण तलावास कागद टाकणेचे काम सुरु असल्याने संस्थानचे नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम), साईआश्रम भक्तनिवास या इमारतींकरीता दि.१३/०१/२०१६ ते दि.१४/०१/२०१६ या कालावधीत व साईप्रसाद नं.०१ व ०२ इमारतींकरीता दि.१२/०१/२०१६ ते दि.१४/०१/२०१६ या कालावधीत भाडोत्री टँकरव्दारे पाणी पुरवठा करणेसाठी झालेला खर्च तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कालावधी | ठिकाण | टँकर व्यवस्थेव्दारे उपलब्ध करुन घेणेत आलेले एकुण पाणी(लिटर) | | दर रुपये प्र.लिटर | विकत घेण्यात आलेले पाणी एकुण खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मोफत | विकत | | |
| ०१ | दि. १३.०१.२०१६ ते दि.१६.०१.२०१६ | नविन भक्तनिवासस्थान व साईआश्रम भक्तनिवास | १,२३,५०० लिटर. | १६,७०,००० लिटर | ०.१३ | २,१७,१००.०० |
| ०२ | दि. १२.०१.२०१६ ते दि.१४.०१.२०१६ | साईप्रसाद नं.०१ व ०२ | २२,००० लिटर | ३,८९,००० लिटर | ०.१३ | ५०,५७०.०० |
| | | | | | एकुण खर्च- | २,६७,६७०.०० |

संस्थानचे नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम), साईआश्रम भक्तनिवास या इमारतींकरीता दि.१३/०१/२०१६ ते दि.१४/०१/२०१६ या कालावधीत १,२३,५०० लिटर पाणी मोफत व १६,७०,००० लिटर भाडोत्री टँकरधारकांकडुन विकत, साईप्रसाद नं.०१ व ०२ इमारतींकरीता दि.१२/०१/२०१६ ते दि.१४/०१/२०१६ या कालावधीत २२,००० लिटर मोफत व ३,८९,००० लिटर भाडोत्री टँकरधारकांकडुन पाणी उपलब्ध करुन घेणेत आलेले आहे. उपरोक्त ठिकाणी एकुण २०,५९,००० लिटर पाणी रु. ०.१३ प्रती लिटर याप्रमाणे भाडोत्री टँकरव्दारे विकत उपलब्ध करुन घेणेसाठी एकुण रु.२,६७,६७०/- मात्र खर्च आलेला आहे. तरी उपरोक्त खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** आपणास जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन पाण्याचे रोटेशन उशिरा सुरु झाल्याने व संस्थान साठवण तलावास कागद टाकणेचे काम सुरु असल्याने भाडोत्री टँकरव्दारे पाणी पुरवठा करुन घ्यावा लागलेला आहे. तरी नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम), साईआश्रम भक्तनिवास या इमारतींकरीता दि.१३/०१/२०१६ ते दि.१४/०१/२०१६ या कालावधीत व साईप्रसाद नं.०१ व ०२ इमारतींकरीता दि.१२/०१/२०१६ ते दि.१४/०१/२०१६ या कालावधीत संस्थान मान्य दराप्रमाणे पाणी पुरवठा करुन घेणेस व त्यासाठी झालेल्या रु.२,६७,६७०/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता व भाडोत्री टँकरव्दारे पाणी पुरवठा करुन घेणेसाठी केलेल्या कार्यवाहीस मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.१९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं. १२** **श्री साई दैनंदिनी व श्री साईबाबा दिनदर्शिका व डिलक्स कॅलेंडर्स २०१६ ची वाढीव छपाई करुन घेणेबाबत.**

प्रस्ताव- मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचा दि. ११.१२.२०१५ चा हुकूमनाम्यानुसार व मा. व्यवस्थापन सिमतीचे दि.१५.१२.२०१५ चे सभेतील निर्णयानुसार प्रिंट प्लस लि. मुंबई यांना श्री साई दैनंदिनी व टँको व्हीजन प्रा.लि. मुंबई यांना श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका (कॅलेंडर) तसेच चेरि ऑफसेट, सोलापूर यांना श्री साईबाबा दिनदर्शिका छपाई कामाचा कार्यदेश देण्यात आला होता त्यानुसार खालील प्रमाणे दैनंदिनी व दिनदर्शिका तसेच डिलक्स कॅलेंडर विक्री बाबतचा तपशिल.

| अं.नं. | तपशिल | आदेशीत छपाई संख्या | विक्री संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी | ७०,००० | ७०,००० |
| ०२ | श्री साईबाबा दिनदर्शिका एक पानी, आकार १९"x२९" | १३०००० | ७०००० |
| ०३ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस) आकार २२" x३५" | ७००० | ७००० |
| ०४ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार १९.२५" x२७.२५" | २००० | २००० |
| ०५ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स आकार १९.००" x२७.००" | १००० | १००० |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी -७ शिटर डेस्क कॅलेंडर्स आकार ९.७५" x ०७" | ३००० | ३००० |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे दैनंदिनी व दिनदर्शिका व डिलक्स कॅलेंडरची विक्री दि.०८.०१.२०१६ रोजी वरील प्रमाणे विक्री झालेली आहे.

अ) दैनंदिनी व दिनदर्शिका व डिलक्स कॅलेंडरसाठी भक्तांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याने दि.०९.०१.२१६ रोजी प्रिंट प्लस लि. मुंबई यांना श्री साई दैनंदिनी व टँको व्हिजन प्रा.लि., मुंबई यांना श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका (कॅलेंडर्स) खालीलप्रमाणे छपाई कामाचा प्रथम वाढीव कार्यादेश आला होता.

| अं.नं. | तपशिल | प्रथम वाढीव छपाई संख्या | छपाई दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी | ४०००० | ६६.१५ | २६४६०००.०० |
| ०२ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस) आकार २२" x३५" | ४००० | २३४.०० | ९३६०००.०० |
| ०३ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार १९.२५" x२७.२५" | २००० | २९३.०० | ५८६०००.०० |
| ०४ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स आकार १९.००" x२७.००" | ५०० | २७३.७० | १३६८५०.०० |
| ०५ | श्री साईबाबा थ्रीडी -७ शिटर डेस्क कॅलेंडर्स आकार ९.७५" x ०७" | १००० | २३८.०५ | २३८०५०.०० |
| | | | एकूण रु. | ४५४२९००.०० |

**श्री साई दैनंदिनी / दिनदर्शिका दि.०३.०२.२०१६ रोजीची शिल्लक व विक्री संख्याबाबत तपशिल.**

| अ.नं. | तपशिल | देण्यात आलेली एकूण छपाई संख्या | दि. ०३.०२.२०१६ ची शिल्लक संख्या | विक्री संख्या | येणे बाकी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी | ११०००० | ० | ९०५०० | १९५०० |
| ०२ | श्री साईबाबा दिनदर्शिका ( एक पानी,) आकार १९"x२९" | १३०००० | ० | १२९७२० | २८० |
| ०३ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस) आकार २२" x३५" | ११००० | १००० | ९९७० | - |
| ०४ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार १९.२५" x२७.२५" | ४००० | ० | ४००० | - |
| ०५ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स आकार १९.००" x२७.००" | १५०० | ० | १५०० | - |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी -७ शिटर डेस्क कॅलेंडर्स आकार ९.७५" x ०७" | ४००० | ० | ४००० | - |

**ब) श्री साईबाबा दिनदर्शिका व डिलक्स कॅलेंडरसाठी भक्तांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याने दुस-यांदा खालील प्रमाणे वाढीव श्री साईबाबा दिनदर्शिका व डिलक्स कॅलेंडर्स छपाईकामी कार्यादेश देण्यात आला आहे.**

| अ.नं. | तपशिल | प्रथम वाढीव छपाई संख्या | छपाई दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा दिनदर्शिका (एक पानी,) आकार १९"x२९" | ५०००० | १५.९० | ७९५०००.०० |
| ०२ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस) आकार २२" x३५" | १५०० | २३४.०० | ३५१०००.०० |
| ०३ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार १९.२५" x२७.२५" | १५०० | २९३.०० | ४३९५००.०० |
| ०४ | श्री साईबाबा थ्रीडी -७ शिटर डेस्क कॅलेंडर्स आकार ९.७५" x ०७" | १५०० | २३८.०५ | ३५७०७५.०० |
| | | | एकूण रु. | १९४२५७५.०० |

सदरचे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका व डिलक्स दिनदर्शिका (कॅलेंडर्स) छपाई करुन घेणेसाठी छपाई पुरवठा आदेशातील अट नं.१२,१३,१४ मध्ये श्री साईबाबा दिनदर्शिका व डिलक्स कॅलेंडर्स संबंधीत आदेशात दिलेल्या संख्येपेक्षा जादा छपाई करता येणार नाही. तथापी संस्थानला आवश्यकता भासल्यास व मागणी केल्यास त्याच दरात, त्याच शर्ती व अटीस अधिन राहून जादा दिनदर्शिकांची (कॅलेंडरची) छपाई विनाअट करुन द्यावी लागेल असे नमुद करण्यात आले आहे.

१) मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील Civil Application No. 11417 दि. ११.१२.२०१५ चा हुकूमनाम्यानुसार श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका व डिलक्स दिनदर्शिका (कॅलेंडर्स) छपाई कामी मान्यता मिळालेली आहे.

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५.१२.२०१५ निर्णय क्र. ५८७ अन्वये सन २०१६ चे श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका प्राप्त निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना त्वरीत कार्यादेश देण्यात यावा व विक्रीसाठी विहीत वेळेत आवश्यकता वाटल्यास याच मंजूर दराने प्रस्तावित श्री साई दैनंदिनी / दिनदर्शिकाची वाढीव छपाई करुन घेण्यात यावी, असे ठरले आहे. तसेच सदरहू छपाईकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार उपरोक्त "अ" व "ब" तक्त्यात दर्शविलेप्रमाणे प्रिंट प्लस प्रा.लि., मुंबई यांचेकडून श्री साई दैनंदिनी व चेरि ऑफसेट, सोलापूर यांचेकडून श्री साईबाबा दिनदर्शिका एक पानी व टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई यांचेकडून साईबाबा डिलक्स दिनदर्शिकांची वाढीव छपाई कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे.

छपाईकामी येणा-या रक्कम रु. ६४,८५,४७५/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

निर्णय क्र.१९६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साई दैनंदिनी व श्री साईबाबा दिनदर्शिका व डिलक्स कॅलेंडर्स २०१६ ची वाढीव छपाई करुन घेणेकामी आलेल्या रु.६४,८५,४७५/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशनेविभाग)

---

विषय नं. १३ **रवा, वटाणा व वनस्पती तुप या किराणा मालाची मागणी पूर्ण झाल्याने वार्षिक मागणीच्या २५ टक्के मालाची खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानने सन २०१५-१६ सालासाठी किराणा माल खरेदीकामी मालाचे पुरवठा आदेश दिले होते. त्यातील काही वस्तूंची वार्षिक मागणी पूर्ण झालेली आहे.

संस्थानने पुरवठा आदेश दिलेल्या किराणा मालाची वार्षिक मागणी विहित वेळेपूर्वी पूर्ण झाल्यास, संस्थानने संबंधित पुरवठाधारकांशी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती क्रमांक ८ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे. "प्रसंगी निविदा कालावधीत व तदनंतरही नमुद केलेल्या मालापेक्षा २५% इतका जादा माल मंजुर दरानेच पुरविणे बंधनकारक राहील."

उर्वरित कालावधीसाठी हा माल आवश्यकतेप्रमाणे खरेदी करणे गरजेचे आहे. तूर्त वार्षिक मागणीच्या २५ टक्के हा माल खरेदी करता येईल. किराणा मालाची वार्षिक मागणी, २५ टक्के मागणी, येणारा खर्च याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | मालाचा तपशिल | वार्षिक मागणी क्विं. | २५% जादा मागणी क्विंटल | मंजुर दर प्रती क्विंटल | २५%जादा खरेदीकामी येणारा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | रवा | ५५०.०० | १३७.०० | २,१५१.०० | २,९५,७६२.५० |
| २ | वाटाणा | ५००.०० | १२५.०० | ३,६००.०० | ४,५०,०००.०० |
| ३ | वनस्पती तुप | ५५०.०० | १३७.०० | ६,८६८.०० | ९,४४,३५०.०० |
| | | | | एकुण खर्च रु. | १६,९०,११२.०० |
| | | | | पुर्णांकित रक्कम रु. | १६,९०,११३००. |

उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे वार्षिक मागणीपेक्षा २५% इतका जादा किराणा माल खरेदीकामी एकुण रक्कम रु.१६,९०,११३/- (अक्षरी रुपये सोळा लाख नव्वद हजार एकशे तेरा मात्र) एवढा खर्च येईल.
प्रसादालयाकडून या मालाची मार्च २०१६ पर्यंत अंदाज करुन वार्षिक मागणी कळविण्यात आली होती .त्याप्रमाणे माल खरेदी केलेला आहे. साईभक्ताना द्यावयाच्या प्रसाद भोजनासाठी पूढील कालावधी साठीया मालाची गरज भासेल म्हणून 25% माल मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. तथापि यापैकी प्रसादालयाकडून प्रत्यक्षात मागणी केलेनंतर आवश्यक मालाच खरेदी करण्यात येत असतो .

संस्थानने सन २०१५-१६ करीता वार्षिक किराणा माल खरेदीकामी C.A. क्रमांक ३४९६ अन्वये (गावरान तुप वगळता) अंदाजे रक्कम रु.४९,२२,००,०००/- (अक्षरी रुपये एकोनपन्नास कोटी बावीस लाख मात्र) चे खर्चाला दिनांक १३.०३.२०१५ रोजी मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिलेली आहे. यातून जुन-२०१५ ते जानेवारी-२०१६ अखेर रु.२२,९८,८९,८४३/-खर्च झालेला आहे. यातील पुढील फेब्रुवारी-२०१६ व मार्च-२०१६ या कालावधीसाठी किराणामाल खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.६,००,००,०००/-(अक्षरी रुपये सहा कोटी मात्र) पर्यंत खर्च येईल. ही एकूण रक्कम रु.२८,९८,८९,८४३/- इतकी होत आहे. तरीही उर्वरित रक्कम रुपये २०,२३,१०,१५७/- (अक्षरी रुपये वीस कोटी तेवीस लाख दहा हजार एकशे सत्तावन्न ) मात्र शिल्लक असल्याने या रकमेतून वरील खर्च करता येईल.

तरी रवा, वाटाणा व वनस्पती तुप या मालाच्या एकूण वार्षिक मागणीच्या २५% इतका जादा माल करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार मंजूर दराने वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे खरेदी करणेस व याकामी येणारे एकूण रक्कम रु.१६,९०,११३/- (अक्षरी रुपये सोळा लाख नव्वद हजार एकशे तेरा) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१९७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे रवा, वाटाणा व वनस्पती तुप या मालाच्या एकूण वार्षिक मागणीच्या २५% इतका जादा माल करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार मंजूर दराने खरेदी करणेस व याकामी येणा-या एकूण रु.१६,९०,११३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करण्यात आलेल्या अतिरिक्त सुविधांसाठी झालेला खर्च मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेपूढे सादर करण्यास मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ चे कालावधीत श्री साईबाबा समाधीच्या दर्शनासाठी होणा-या गर्दीचे अनुषंगाने शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरिक्त सोयी-सुविधा उपलब्ध करणे आवश्यक असल्याने त्या अनुषंगाने संस्थानतर्फे गर्दीचे कालावधीत भक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधांमध्ये साईभक्तांच्या वाहनासांठी वाहनतळे तयार करणे, तातपुरत्या स्वरुपाची निवासव्यवस्था, अतिरिक्त दर्शनरांग व्यवस्था, तात्पुरत्या सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, पाणीपुरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसाद भोजनव्यवस्था, अल्पोपहार इत्यादी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

त्या अनुषंगाने संस्थानचे संबंधीत विभागांनी आपापल्या विभागामार्फत साईभक्तांना द्यावयाच्या अतिरिक्त सोई-सुविधांबाबतचे प्रस्ताव, अंदाजे खर्चाची रक्कम, विभागांना करावी लागणारी कार्यवाही इत्यादीबाबत अंदाजपत्रक सादर केले होते. संस्थानचे संबंधीत विभागांनी दिलेल्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या एकत्रित प्रस्तावास मा. त्रिसदस्य समितीचे दि. ३०/०१/२०१५ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्र.०६ अन्वये नियोजित कामासाठी येणारे अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहु खर्चास परवानगी मिळणेसाठी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील रिट पिटीशन नं.१८/२०११ मध्ये सिव्हील अर्ज क्र.३५००/२०१५ अन्वये दाखल करण्यात आला होता. त्यास मा. उच्च न्यायालय यांनी दि. ०६/०५/२०१५ रोजी खालील अटी व शर्तीवर मान्यता दिलेली आहे. "......... *The Applicant shall see to it that it makes all these arrangments at minimum expense and will take steps to make all the arrangements by spending competitively. Though we are permitting the Applicant to spend the amount as spelt*

*out in prayer clause (B) of the Application. The Applicant shall see that no unnecessary expenses are made. Shall maintain the separate account and on the culmination of the said Kumbhamela festival, shall submit the accounts to the Court regarding the expenses made, within a period of FOUR WEEKS from the date of culmination of the Kumbhamela."*

मा.उच्च न्यायालयाचे वरील आदेशान्वये कुंभमेळा खर्चाचे स्वतंत्र खाते ठेवून कुंभमेळा संपल्यानंतर ०४ आठवड्याचे आत म्हणजेच दि. २३/१०/२०१५ अखेरपर्यंत मा. उच्च न्यायालयात सादर करणे आवश्यक होते. तथापी काही विभागाकडून सदर खर्चाची कार्यवाही पूर्ण झालेली नसल्याने एकत्रित स्वरुपात सदरचा खर्च मा. उच्च न्यायालयाकडे सादर करता आलेला नाही. त्यामुळे याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/१०/२०१५ रोजीचे सभेत सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ मधील गर्दीचे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करण्यात आलेल्या अतिरिक्त सोई– सुविधांकरीता झालेल्या खर्चाचा अहवाल मा. उच्च न्यायालयापूढे सादर करणेकामी दोन महीने मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन सदरहु सभेतील निर्णय क्र. ४३४ अन्वये त्यास मान्यता देण्यात आली.

तथापी याबाबत कुंभमेळा कक्षाकडील दि.२६/०९/२०१५रोजीचे कार्यालयीन आदेशाव्दारे "संबधीत विभागांना आपले विभागासंदर्भात केलेल्या खर्चाबाबत आदेशात नमूद "अ" व "ब" तक्त्यात दर्शविलेप्रमाणे सविस्तर माहिती तयार करुन सदरची माहिती लेखाशाखेकडील रेकॉर्डप्रमाणे बरोबर असलेबाबत लेखाधिकारी यांचेकडून प्रमाणित करुन आवश्यक कागदपत्रासंह कुंभमेळा कक्षाकडे सादर करावी, जेणेकरुन हा प्रमाणित खर्च मा. उच्च न्यायालयाकडे सादर करणे सोईचे होईल" असे कळविण्यात आले होते.

त्यानुसार संबधीत विभागांनी सिंहस्थ कुंभमेळा २०१५ मधिल गर्दीचे कालावधीत साईभक्तांसाठी झालेल्या खर्चाचा प्रमाणित अहवाल खालीलप्रमाणे कळविलेला आहे.

**अ) मा उच्च न्यायालयाचे मान्यतेने सिंहस्थ कुंभमेळा -२०१५ मधिल गर्दीचे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करण्यात आलेल्या अतिरिक्त सोई सुविधांसाठी झालेला खर्च:-**

**नमुना:- "अ"**

**I) मटेरिअल खरेदी:-**

| अ. नं. | विभागाचे नाव | कामाचा तपशील | अपेक्षित अंदाजे खर्चाची रक्कम | मा. कोर्टाने मंजूर केलेली रक्कम | प्रत्यक्षात झालेला खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बांधकाम विभाग | वाहनतळावर मुरुम व खडीकरण करणे, (रॉयल्टी चार्जेससह) टॉयलेट ओटा तयार करुन त्यावर रफ शहाबादी फरशी बसविणे, निवारा व अल्पोपहार शेड आदिंचे कडेने वीट बांधकाम करणे. | 708,00,158/- | 1065,13,908/- | 301,88,975/- | |
| | | वाढीव दराने शासनास देय्य असलेली रॉयल्टी रक्कम | | | 50,38,301.00 | |
| | | वाहनतळ, अतिरिक्त दर्शनरांग, संस्थान भक्तनिवास या ठिकाणी पत्रा शेड पार्टीशन व बॅरेकेडींग | 352,13,750.00 | | 184,82,882.00 | |
| | | शिर्डी व परिसरात पोर्टेबल टॉयलेट व युरिनल्स भाडेतत्वावर घेणे. | | | 29,46,600.00 | |
| | | मंडपाचे कडेने विट बांधकाम करणेसाठी विटा खरेदी | | | 21,000.00 | |
| | | बोर्ड व बॅनर लावणे | 2,00,000.00 | | 2,67,417.00 | |
| | | प्रेझेंटेशन,संगणकिकरण, प्रिंटींग खर्च | 3,00,000.00 | | 35,965.00 | |
| २ | पाणीपुरवठा विभाग | मटेरिअल खरेदी | 17,97,960.00 | 25,38,840.00 | 15,05,264.00 | पुरवठादार यांना एकूण रु. १५०५६९२/- मात्रचा पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. |
| | | | | | 1,87,005.00 | निर्णय क्र.२७७, दि.२०/०८/२०१५ अन्वये वाढीव मटेरिअल खरेदी |
| | | भाडोत्री टॅंकर खर्च | 7,40,880.00 | | 0.00 | निरंक |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | सी.सी.टिव्ही विभाग | डिजीटल स्क्रिन व टाटा स्काय (१२ एलईडी स्क्रीन) | 24,00,000.00 | 24,00,000.00 | 9,57,600.00 | |
| | | दर्शनरांगेत साईभक्तांना लाईव्ह दर्शन | | | 56,448.00 | (बांधकाम विभागामार्फत खर्च) |
| ४ | साईआश्रम | अहवाल निरंक | 0.00 | 0.00 | 0.00 | निरंक |
| ५ | साईप्रसाद निवासस्थान | बेंच पावती पुस्तक छपाई खर्च | 1,00,000.00 | 1,00,000.00 | 0.00 | सदरचे काम श्री साई संस्थान ए.क्रे. को. ऑप. सो. लि. यांना देण्यात आल्याने खर्च झालेला नाही. |
| ६ | कॅन्टीन विभाग | किराणा माल | 261,37,250.00 | 261,62,850.00 | 0.00 | खरेदी विभागामार्फत एकत्रीत खरेदी करण्यात आलेला आहे. |
| | | टी. जार. खरेदी | 25,600.00 | | 23,616.00 | |
| ७ | लाडू प्रसाद निमिर्ती विभाग | किराणा माल | 1014,51,375.00 | 1106,34,875.00 | 0.00 | निरंक |
| | | ठेकेदारी मजुरी | 83,83,500.00 | | 1,39,425.00 | |
| | | भाडोत्री साहित्य | 5,00,000.00 | | 0.00 | निरंक |
| | | इतर तातडीचा खर्च | 3,00,000.00 | | 0.00 | निरंक |
| ८ | श्री साई प्रसादालय | प्रसाद भोजन वाढीव खर्च (अंदाजपत्रकीय मुळ रकमेच्या १०%) | 259,19,000.00 | 259,19,000.00 | 0.00 | निरंक |
| ९ | खरेदी विभाग | अहवाल निरंक | | 0.00 | 0.00 | निरंक |
| १० | भांडार विभाग | अहवाल निरंक | | 0.00 | 0.00 | निरंक |
| ११ | आरोग्य विभाग | स्वच्छता साहित्य खरेदी | 6,14,100.00 | 6,14,100.00 | 4,11,560.00 | खरेदी विभागामार्फत |
| १२ | विद्युत विभाग | जनरेटर सेट भाडेतत्वावर घेणे | 6,55,500.00 | 33,79,550.00 | 6,18,342.00 | |
| | | इलेक्ट्रीकल मटेरिअल खरेदी | 9,96,350.00 | | 9,96,327.00 | |
| | | इलेक्ट्रीकल मटेरिअल खरेदी | 9,23,700.00 | | 9,23,591.00 | |
| | | विज जोडणी सिक्युरिटी चार्जेस | 75,000.00 | | 0.00 | सिक्युरिटी डिपॉझिट परत |
| | | लाईट व्यवस्थेकरीता मनोरे खर्च | 7,29,000.00 | | 0.00 | बांधकाम विभागामार्फत खर्च |
| १३ | वाहन विभाग | इंधन खर्च | 2,11,349.00 | 2,11,349.00 | 0.00 | निरंक |
| १४ | जनसंपर्क | माहिती पुस्तिका खर्च | 1,00,000.00 | 1,00,000.00 | 12,120.00 | माहिती पुस्तिका छपाई |
| १५ | संरक्षण विभाग | सुरक्षा साहित्य खर्च | 2816,04,400.00 | 2816,04,400.00 | 91,24,716.00 | सुरक्षा साहित्य खरेदीकामी कर विरहीत रु.१,५२,८६,०१३/- मात्र रकमेच्या वर्कऑर्डर देण्यात आलेल्या होत्या. अद्याप रु.९१,२४,७१६/-मात्रचे सुरक्षा साहित्याची बिले संबंधीत पुरवठादार यांना आदा करणेत आलेली आहेत रु.२६,५२,०६६/- मात्रचे (ॲंग्युलर वायरलेस टॉवर) बिल अदा करणेची कार्यवाही चालू आहे. |
| | | | | | 26,15,066.00 | |
| | | | | | 46,03,750.00 | कुंभमेळयाचे वेळी कार्यदेश दिलेले परंतु अद्याप ताब्यात न मिळालेले सुरक्षा साहित्य शताब्दी वर्ष २०१८ चे निमित्ताने होणारे गर्दीचे नियोजनसाठी आवश्यक असलेचे पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी कळविले असल्याने साहित्य घ्यावे किंवा कसे याबाबत निर्णय होणेसाठी मा. त्रिसदस्य समिती सभेपूढे प्रस्ताव सादर केला आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पोलीस विभागाकरीता ३५० नग लोखंडी बॅरिकेडस | | | 16,27,448.00 | मेकॅनिकल विभागाकडून तयार करुन |
| १६ | ध्वनिक्षेपण | उद्धोषणा केंद्र उभारणी | 4,50,000.00 | 4,50,000.00 | | बांधकाम विभागामार्फत खर्च |
| १७ | फायर अँण्ड सेफ्टी विभाग | साहित्य खरेदी | 2,85,000.00 | 4,85,000.00 | 29,680.00 | उर्वरीत रु.२२२५००/- मात्रचे फायर व सेफ्टी साहित्य पुणे येथील मनोज फायर इक्वीपमेंट यांनी देणगी स्वरुपात दिले. |
| | | अग्निशमन वाहन ऑनकॉल/पूर्णवेळ | 2,00,000.00 | | 35,460.00 | |
| १८ | मेकॅनिकल विभाग | १६ गुंठे परिसर स्टेनलेस स्टील रेलींग | 55,00,000.00 | 62,50,000.00 | 24,81,934.00 | |
| | | विविध ठिकाणी बॅरेकेडींग करणे | 7,50,000.00 | | 5,58,185.00 | |
| १९ | अभिलेख कक्ष | | | | 0.00 | निरंक |
| **एकूण रक्कम रुपये:-** | | | **5673,63,872.00** | **5673,63,872.00** | **838,88,677.00** | |

**II) मनुष्यबळ खर्च:-**

| अ.नं. | विभागाचे नाव | कामाचा तपशील | अपेक्षित अंदाजे खर्चाची रक्कम | मा. कोर्टाने मंजूर केलेली रक्कम | प्रत्यक्षात झालेला खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | साईधर्मशाळा | जादा प्रासंगिक मनुष्यबळ खर्च | 2,45,700.00 | 2,45,700.00 | 15,000.00 | |
| २ | व्दारावती भक्तनिवास स्थान | | 1,60,875.00 | 1,60,875.00 | 8,000.00 | आयटिआय प्रशिक्षणार्थी मानधन बिल |
| ३ | साईबाबा भक्तनिवास स्थान | | 1,40,000.00 | 1,40,000.00 | 18,897.00 | कंत्राटी कामगार मजूरी |
| ४ | साईप्रसाद निवासस्थान | | 10,02,792.00 | 10,02,792.00 | 0.00 | क्लोकरुम चालविणेचे काम श्री साई संस्थान ए.क्रे. को. ऑप. सो. लि. यांना देण्यात आल्याने मंजूर रक्कम खर्च झालेली नाही. |
| ५ | श्री साईप्रसादालय | | 28,43,750.00 | 28,43,750.00 | 6,10,304.00 | वाढीव मनुष्यबळ खर्च |
| ६ | श्री साईआश्रम भक्तनिवास | जादा प्रासंगिक मनुष्यबळ खर्च | 1,20,900.00 | 1,20,900.00 | 7,200.00 | आयटिआय प्रशिक्षणार्थी मानधन बिल |
| ७ | कॅन्टीन | | 7,60,500.00 | 7,60,500.00 | 44,097.00 | |
| ८ | लाडू प्रसाद निर्मीती | | 3,51,000.00 | 3,51,000.00 | 10,100.00 | |
| ९ | आरोग्य | | 17,29,000.00 | 17,29,000.00 | 2,75,055.00 | |
| १० | विद्युत | | 2,29,509.00 | 2,29,509.00 | 0.00 | निरंक |
| ११ | वाहन | | 2,32,141.00 | 2,32,141.00 | 1,66,019.00 | |
| १२ | फायर अँण्ड सेफ्टी | | 3,00,300.00 | 3,00,300.00 | 71,489.00 | जादा कंत्राटी कर्मचारी बिल |
| **एकूण रक्कम रुपये:-** | | | **81,16,467.00** | **81,16,467.00** | **12,26,161.00** | |

उपरोक्त प्रमाणे नमुना अ(I+II) मध्ये दर्शविलेला एकूण रक्कम रु.८,५१,१४,८३८/- मात्र(अक्षरी रक्कम रुपये:- आठ कोटी एक्कावन्न लाख चौदा हजार आठशे आडोतीस) इतका खर्च मा. उच्च न्यायालयाने मान्यता दिलेल्या खर्चातून झालेला आहे.

तथापी वरील खर्चाव्यतिरिक्त आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर, मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर, मा. व्यवस्थापन समिती तसेच मा. उपविभागीय अधिकारी शिर्डी भाग शिर्डी तथा अध्यक्ष, तालुकास्तरीय कुंभमेळा समिती शिर्डी, मा. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान शिर्डीयांनी वेळोवेळी घेतलेल्या बैठकीतील निर्णयान्वये वरील कामाव्यतीरिक्त संस्थानकडून खालीलप्रमाणे वाढीव कामे करण्यात आलेली आहेत:-

नमुना:- "ब"

| अ. नं. | विभागाचे नाव | तपशील | मंजुरी घेतलेली रक्कम | प्रत्यक्षात झालेला खर्च | मा. व्य. स. ठराव नं. व दि. / कार्यालयीन मंजूर टिपणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बांधकाम विभाग | कचरा टाकणेकामी संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथिल गट नं. १८२ मध्ये खड्डा खोदणे. | 2,95,000.00 | 10,655.00 | मा.त्रिसदस्य समितीचे दि. १८/०८/२०१५ रोजीचे सभेत खर्चास मान्यता | |
| | | जुने प्रसादालय इमारतीत अतिरिक्त दर्शनरांग करणेसाठी अंतर्गत रंगकाम | 3,13,710.00 | 1,57,407.00 | निर्णय क्रं. २०४(४६)/ दि.२३/०७/२०१५ | |
| | | साईभक्तांचे सुविधेकरीता विविध ठिकाणी फिरते शौचालय ठेवणेसाठी फिरते शौचालय खरेदी करणे. | 39,00,000.00 | 39,00,000.00 | मा.त्रिसदस्य समितीचे दि. १८/०८/२०१५ रोजीचे सभेत खर्चास मान्यता | |
| | | मौजे निमगाव को-हाळे येथिल चर रस्ता दुरुस्ती करणे(नगर-मनमाड रस्ता ते साईप्रसाद हाऊसिंग सोसायटी) | 56,525.00 | 28,188.00 | मा.त्रिसदस्य समितीचे दि. १८/०८/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २६९ | |
| | | वाहनतळावरील विद्युत विभागाचे कंट्रोल बॉक्सचे बोर्डकरीता प्लायवूड बसविणे | | 3,960.00 | | |
| | | वाहनतळावर कार्यालयीन कामकाजाकरीता भाडेतत्वावर टेबल व्यवस्था करणे. | 4,800.00 | 5,600.00 | दि.२७/०८/२०१५ रोजीची मा. का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | |
| | | श्री साईप्रसादालय येथे चपाती मशिनवर वाटरप्रूफ छत असलेला मंडप उभारणे | | 24,360.00 | श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१५ चे मंडप व्यवस्था मंजूर दरात मंडप उभारणी | |
| | | जूने प्रसादालय व मंदिर परिसरात दुरुस्तीचे कामाकरीता वाळू खरेदी | 24,500.00 | 21,408.00 | दि.०७/०८/२०१५ रोजीची मा. का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | |
| २ | कुंभमेळा कक्ष | वाहनतळ वापरासाठी घेतलेला जमिनीचा भाडेपट्टा | 98,58,651.00 | 45,00,258.00 | मा. त्रिसदस्य समितीचे दि.१५/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६०६ | बिले अदा करणे बाकी आहे. |
| ३ | पाणीपुरवठा विभाग | वाहनतळ क्रमांक ०१ ते ०७ ठिकाणी पाणी व्यवस्थेसाठी तातडीने प्लंबींग नळ कनेक्शन वबोर्ड तयार करणे | 24,000.00 | 17,146.00 | दि.१०/०८/२०१५ रोजीची अॅडव्हॉन्स मिळणेबाबतची टिपणी | |
| | | टाक्यांमधील पाणी शुध्दीकरणासाठी लिक्वीड क्लोरीन खरेदी | 4,000.00 | 3,696.00 | दि.०६/०८/२०१५ रोजीची मा. का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | |
| ४ | साईप्रसाद निवासस्थान | शिर्डी पोलीस स्टेशनकरीता २०० नग भाडोत्री खुर्च्या | 15,000.00 | 3,000.00 | दि.११/०९/२०१५ रोजीची मा. का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | |
| ५ | कॅन्टीन विभाग | टि. जार भाडेतत्वावर घेणे | 10,000.00 | 2,650.00 | दि.१९/०८/२०१५ रोजीची मा. का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | |
| | | पाणी जार मधील पाणी | 1,225.00 | 225.00 | दि.३१/०८/२०१५ची प्रशासकिय मंजूरी | |
| ६ | श्री साई प्रसादालय | व्हीआयपी कक्षात वाढीव बैठक व्यवस्थेसाठी भाडोत्री फर्निचर | 10,500.00 | 7,000.00 | दि.१६/०९/२०१५ रोजीची मा. का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | |
| ७ | आरोग्य विभाग (स्वच्छता) | शिर्डी नगरपंचायत करीता कुंभमेळा १५ साठी देण्यात येणा-या १०० कर्मचा-यांचे वेतनावरील खर्च | 10,49,536.00 | 0.00 | मा. त्रिसदस्य समितीचे दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १९० | जादा कर्मचारी नेमले नाहीत. |
| | | तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती राहाता यांना कुंभमेळा -२०१५ करीता देण्यात येणा-या १३ लिटर डेल्टामेथ्रीनेचे खरेदीचा खर्च | 24,050.00 | 0.00 | दि.२८/०८/२०१५ रोजीची मंजूर टिपणी | वेळेत पुरवठान केल्याने पुरवठा आदेश रद्द. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | विद्युत विभाग | वाढीव नविन वाहनतळ क्र. ०८,०९ व १० ठिकाणी विद्युत जोडणी सिक्युरिटी डिपॉझिट | 61,700.00 | 0.00 | मा. त्रिसदस्य समितीचे दि.२०/०८/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २७९ | सिक्युरिटी डिपॉझिट परत |
| | | वाहनतळक्र.१, ०२, ०६, ०७, ०८, ०९ व १० येथील राज्य विज वितरण कंपनी विद्युत पुरवठा बिले | 2,00,000.00 | 2,28,030.00 | दि.०७/१०/२०१५ रोजीची मा. का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | विजपुरवठा बिले |
| | | प्रोसेसिंग फी | | 800.00 | | |
| ९ | वाहन विभाग | मा.जिल्हाधिकारी सो. अहमदनगर यांचेमार्फत अधिग्रहीत करण्यात आलेल्या खाजगी बसेस/ वाहने यांचेकरीता लागणारा इंधन खर्च | 6,88,500.00 | 1,88,726.00 | मा. त्रिसदस्य समितीचे दि.१८/०८/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २६० | |
| | | पाणी वाहतूक टँकर इंधन खर्च | 50,000.00 | 13,092.00 | | |
| | | तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती राहाता यांचे मार्फत पुरविण्यात येणा-या रुग्णवाहीका/ वैद्यकिय पथक/ पर्यवेक्षकिय वाहन आदि एकूण २५ वाहनांसाठी तसेच फोगींगसाठी लागणारा इंधन खर्च | 2,50,000.00 | 55,229.00 | मा. त्रिसदस्य समितीचे दि.१८/०८/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २६० | |
| | | आपत्तकालीन विभागासाठी जेसीबी, हायड्रोकेन क्रेन डंपर भाडोत्री वाहन खर्च | 9,25,000.00 | 1,24,305.00 | मा.त्रिसदस्य समितीचे दि.२०/०८/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २८३ | |
| | | शिर्डी नगरपंचायत यांना भाडे तत्वावर उपलब्ध करुन दिलेला मालवाहू टेम्पो | 49,600.00 | 48,000.00 | मा.त्रिसदस्य समितीचे दि. २३/०७/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २०४(४१) | |
| | | वाहनतळ ते दर्शनरांग व वाहनतळ भक्तांना ने आण करणेकरीता २५ खाजगी बसेस | 23,50,000.00 | 14,11,474.00 | | |
| | | दुसरे पर्वणीचे वेळी राज्य परिवहन मंडळ कोपरगाव यांचे वापरलेले भाडोत्री बसेस बील | 1,99,584.00 | 1,99,584.00 | दि.०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय | |
| १० | जनसंपर्क विभाग | दुरध्वनी मार्गदर्शिका तयार करणे | 10,000.00 | 10,000.00 | दि.२५/०८/२०१५ रोजीची मा.का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | एकूण ०२ बीले |
| | | प्रश्नावली (एफ ए क्युज) मराठी | 25,000.00 | 24,200.00 | दि.२९/०८/२०१५ रोजीची मा.का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | |
| | | नकाशा छपाई | 25,000.00 | 17,600.00 | दि.०७/०९/२०१५ रोजीची मा.का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | |
| | | संस्थान विभागांचे फ्लेक्स बोर्ड छपाई | 1,25,000.00 | 1,19,099.00 | दि.०८/०८/२०१५ रोजीची मा.का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | |
| | | प्रश्नावली (एफ ए क्युज) मराठी | 20,000.00 | 19,800.00 | दि.१२/०९/२०१५ रोजीची मा.का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | |
| ११ | संरक्षण विभाग | स्वंयसेवक ओळखपत्र २००० नग छपाई | 8,800.00 | 8,800.00 | दि.०८/०८/२०१५ रोजीची मा.का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | |
| | | ५००० नग दर्शनरांगेतून बाहेरजाणे व परत येणेकामी प्रवेश पास छपाई खर्च | 2,500.00 | 2,500.00 | दि.१३/०८/२०१५ रोजीची मा.का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | |
| | | स्वंयसेवकाचे ८३७ नग देणगी टी शर्टवर छपाई खर्च | 4,980.00 | 4,980.00 | दि.०१/०९/२०१५ रोजीची मा.का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | |
| | | शासकिय अधिकारी व कर्मचारी ओळखपत्र छपाई खर्च ३६०० नग | 16,200.00 | 16,200.00 | दि.२७/०८/२०१५ रोजीची मा.का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | |
| | | ११०० नग प्रशिस्तपत्रक छपाई खर्च | 9,500.00 | 8,200.00 | दि.१४/०९/२०१५ रोजीची मा.का. अ. मान्यतेची मंजूर टिपणी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | दि.१५/०८/२०१५ते३०/०९/२०१५ अखेर वाढीव सुरक्षा रक्षक (मॉडर्न) | 7,91,104.00 | 5,90,004.00 | मा.त्रिसदस्य समितीचे दि.१८/०८/२०१५ चे सभेतील निर्णय क्रं.२५८ |
| | | दि.१५/०८/२०१५ते३०/०९/२०१५ अखेर वाढीव सुरक्षारक्षक (जय भवानी) | 9,04,118.00 | 8,76,258.00 | |
| | | आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण खर्च | 72,000.00 | 72,000.00 | मा.त्रिसदस्य समितीचे दि.०१/०६/२०१५ चे सभेतील निर्णयक्र.३३ |
| | | यशदा आपत्ती व्यवस्थापन आराखडा खर्च | 3,00,000.00 | 3,00,000.00 | मा. त्रिसदस्य समितीचे दि. २४/०६/२०१५ चे सभेतील निर्णय क्र.३९ |
| १२ | ध्वनिक्षेपण विभाग | पोलीस स्टेशनकरीता भाडेतत्वावर मध्यवर्ती ध्वनिक्षेपण यंत्रणा उभारणे. | 22,96,000.00 | 15,50,400.00 | मा.त्रिसदस्यसमितीचे दि.०२/०८/२०१५चे सभेतील निर्णय क्र. २४६, |
| १३ | मेकॅनिकल विभाग | जूने प्रसादालयामध्ये वाढीव दर्शन रांगेसाठी लोखंडी वॉकर रेलींग तयार करुन बसविणे | निर्णयक्र.०६, दि. ३१/०१/१५ अन्वये एकत्रित मंजुरी | 30,90,156.00 | मा.त्रिसदस्य समितीचे दि.२४/०६/२०१५ चे सभेतील निर्णयक्र. १६३ |
| | | गुरुस्थान गेटमधून मंदिर परिसरात प्रवेश देण्यासाठी पाय-यांच्या ठिकाणी रॅम्पची व्यवस्था करणे. | 49,200.00 | 48,000.00 | मा.त्रिसदस्य समितीचे दि. २३/०७/२०१५ चे सभेतील निर्णयक्र. २०९ |
| | | वाढीव कर्मचारी | | 6,900.00 | परिपत्रक १४/०९/२०१५ |
| १४ | श्री साईबाबा हॉस्पिटल | मेडीकल स्टोअर कुंभमेळा औषध खरेदी (मंजूर दराने) | 6,00,000.00 | 1,43,799.00 | दि.०८/०९/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय |
| | | औषधे खरेदी (तातडी खरेदी) | 2,78,101.00 | 2,14,705.00 | |
| | | ग्रामीण रुगणालय राहाता यांना दिलेले औषधे | मंजूरदराने उपलब्ध असलेल्या औषधांपैकी मागणी केलेली औषधे | 93,497.00 | दि. ०२/०८/२०१५ रोजीचे सभेतील व्यवस्थापन समिती सभा निर्णय |
| १५ | लेखाशाखा विभाग | सिंहस्थ कुंभमेळा कालावधीतील स्वंयसेवक मानधन | कामगार विभागाची एकत्रीत मंजूरी | 15,400.00 | दि. ११/०८/२०१५ ची कामगार विभागाची मंजुरी |
| | | **वाढीव कामांसाठी खर्च झालेली एकूण रक्कम रुपये:- (ब)** | **268,74,384.00** | **181,87,291.00** | |

**एकूण (अ) रु.८,५१,१४,८३८/- + (ब) रु.१,८१,८७,२९१/- = रु.१०,३३,०२,१२९/- मात्र.**

उपरोक्त नमुना "अ" व "ब" तक्त्यामध्ये नमूद रु.१०,३३,०२,१२९/- (अक्षरी रक्कम रुपये दहा कोटी तेहतीस लाख दोन हजार एकशे एकोणतीस) मात्र इतका खर्च सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी झालेला आहे. यापैकी लेखाशाखा विभागाकडून दि.२०/०२/२०१६ अखेर रु.२,५०,३७,३२०/- मात्र इतकी रक्कम ॲडव्हान्स अदा केलेली असून रु.६,१०,५६,३०९/- मात्र इतक्या रकमेची बिले संबधीत कामाचे ठेकेदार व पुरवठादार यांना अदा केलेली आहेत. अशा प्रकारे लेखाशाखेकडून अदा झालेली रक्कम रु.८,६०,९३,६२९/- मात्र वजा जाता रु.१,७२,०८,५००/- मात्र इतक्या रकमेची बिले अदा करणे बाकी आहे.

तरी वर नमुना "अ" व "ब" तक्त्यांमधील सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ चे कालावधीत झालेल्या रक्कम रु.१०,३३,०२,१२९/- (अक्षरी रक्कम रुपये दहा कोटी तेहतीस लाख दोन हजार एकशे एकोणतीस) मात्र खर्चाची लेखाशाखा विभागाने प्रमाणित केलेली माहिती मा. उच्च न्यायालयपुढे सादर करणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.१९८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे नमुना "अ" व "ब" तक्त्यामधील सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ चे कालावधीत झालेल्या रक्कम रु.१०,३३,०२,१२९/- मात्र खर्चाची लेखाशाखा विभागाने प्रमाणित केलेली माहिती मा.उच्च न्यायालपुढे सादर करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ **मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थानचे भक्तनिवास/प्रसादालय येथे वितरीत करावयाच्या आरती/दर्शन पास संदर्भात शिर्डी ग्रामस्थांकडून प्राप्त झालेल्या निवेदनाबाबत.**

प्रस्ताव- **व्यवस्थापन समितीचे ठराव क्रं.** – दि. १६.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १५९.

**प्रस्ताविक:** साईटेक प्रकल्पाअंतर्गत सद्यस्थितीत जनसंपर्क कार्यालय येथे कार्यान्वीत करण्यात आलेल्या व ऑनलाईन सर्व्हिसेस या कार्यप्रणालीद्वारे श्री साईभक्तांना आरती/दर्शन पास बुक करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर कार्यप्रणालींद्वारे आरती/दर्शन पास घेऊन आलेल्या श्री साईभक्तांना शनिमंदिरासमोरील गेटमधून समाधी मंदिरामध्ये प्रवेश दिला जातो. इतर सर्व साईभक्तांना दर्शन रांगेमधून समाधी मंदिरात आरती व दर्शनासाठी प्रवेश दिला जातो. जनसंपर्क कार्यालय व ऑनलाईन सर्व्हिसेस येथुन वितरीत करावयाच्या पासेसचा कोटा ठरवून देण्यात आलेला आहे.

तथापी, ब-याच वेळेस ऑनलाईन सर्व्हिसेस कार्यप्रणालीतील आरती/दर्शन पासचा कोटा शिल्लक राहत असलेकारणाने, हा शिल्लक असलेल्या कोट्यातून संस्थानचे निवासस्थानामध्ये रुम घेतलेल्या व प्रसादालयात येणा-या श्री साईभक्तांना पास वितरीत करणेसंदर्भातील प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि. १६.०२.२०१६ रोजीचे सभेसमोर निर्णयार्थ ठेवण्यात आलेला होता. सदर प्रस्तावावर निर्णय क्रं. १५९ अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत. "साईटेक प्रकल्पाअंतर्गत ऑनलाईन सर्व्हिसेसच्या कोट्यातील शिल्लक आरती व दर्शन पास करीता वितरण काऊंटर्स संस्थानचे भक्तनिवास व प्रसादालयामध्ये प्रायोगिक तत्वावर 5 ठिकाणी काऊंटर सुरु करणेस व त्याकामी आवश्यक संगणक व संगणकिय साहित्य देणगी स्वरुपात शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेकडून स्वीकारणेत यावे. सदरचे आरती व दर्शन पास भक्तनिवासस्थान येथे निवासस्थान घेणा-या साईभक्तास तसेच प्रसादलयात व्ही.आय.पी. कक्षात भोजनप्रसाद घेणा-या साईभाक्तासच देण्यात यावे"

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयाविरोधात शिर्डी ग्रामस्थांनी दि. १६/०२/२०१६ रोजी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे. "सदर निर्णय हा अतिशय चुकीचा असून सर्वसामान्य साईभक्तांसाठी दुर्दैवी आहे. सदर निर्णयामुळे साईभक्तांमध्ये चुकीचा संदेश जाईल की, संस्थानमध्ये रुम घेतल्यास व प्रसादालयात व्ही.आय.पी भोजन घेतल्यास दर्शन व आरतीचा पास मिळतो. त्यामुळे सामान्य दर्शन रांगेतुन जाणारे सर्वसाधारण साईभक्तांवर होईल. या निर्णयामुळे साईभक्त व ग्रामस्थांमध्ये तिव्र नाराजी झालेली आहे.

व्यवस्थापन समितीने सदरचा निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा अन्यथा शिर्डी ग्रामस्थ व साईभक्तांचे वतीने रस्त्यावर उतरुन तिव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल, याची सर्व जबाबदारी त्रिसदस्य समितीवर राहील.

**तरी व्यवस्थापन समितीने उपरोक्त निर्णय तातडीने रद्द करावा ही विनंती."**

**मागणी:** मा.व्यवस्थापन समितीचे दि. १६.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १५९ चे संदर्भात शिर्डी ग्रामस्थांकडून प्राप्त झालेले निवेदन, अवलोकनार्थ तथा पुढील आदेशास्तव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाणनी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाणनी करुन अनुमान :** धोरणात्मक.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** मा.व्यवस्थापन समितीचे दि. १६.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१५९ चे संदर्भात शिर्डी ग्रामस्थांकडून प्राप्त झालेले निवेदन, अवलोकनार्थ तथा पुढील आदेशास्तव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

निर्णय क्र.१९९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०३ **दि.१०/०२/२०१६ रोजी शिर्डी ग्रामस्थांसोबत झालेल्या समन्वय सभेतील समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवणे, समाधी मंदिरातील समाधीच्या काचा काढणे व श्रीद्वारकामाई येथील दर्शन व्यवस्थेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

१७ (१) (झ) सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल, व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व सर्व गोष्टी करील.

२१(१) (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) भक्तांना देवतांच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणत्याही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. अशा तरतुदी नमुद आहेत.

**प्रस्तावना-**

गुरुवार, दि.११/०२/२०१६ रोजी शिर्डी ग्रामस्थांच्या वतीने समाधी मंदिरातील समाधीच्या काचा काढणे व श्रीद्वारकामाई साईभक्तांसाठी खुले करणेबाबत आंदोलनकर्ते यांची बैठक दि.१०.०२.२०१६ रोजी लेंडीबागे शेजारील साईनिवास अतिथीगृहातील सभेचे इतिवृत्त सादर केले आहे त्यामध्ये मंदिर विभागासंदर्भात खालीलप्रमाणे मागण्या उपस्थित केल्या आहेत-

१. संस्थानने आरतीचे वेळेमध्ये वेळोवेळी बदल केलेला असुन दि.३१ डिसेंबर रोजी मंदिर रात्रभर उघडे ठेवण्यात येते. तिरुपती देवस्थानने त्यांचे कार्यक्रमात बदल केलेला नाही, तेथे भक्त तीन-तीन दिवस दर्शनासाठी थांबतात. तरी येथुन पुढे मंदिराचे कार्यक्रमात बदल करु नये. साईगार्डन व लेझर पार्कचे काम लवकरात लवकर पुर्ण करावे.

२. ग्रामस्थांनी समाधीला लावण्यात येणा-या काचा काढणेबाबत मांडलेल्या आहेत. परंतु, याबाबत कुठलाही ठोस निर्णय झालेला नाही. तरी काचा तातडीने काढण्यात याव्यात व यापुढेही काचा कधीही लावण्यात येऊ नये.

३. सन-२०१० मध्ये श्रींच्या समाधीला लावण्यात येणा-या काचाबाबत जो व्यवस्थापन समितीचा ठराव झालेला आहे, तो निरस्त करुन कायमस्वरुपी काचा लावणेचे बंद करणेबाबत नविन ठराव करावा.

४. द्वारकामाई मंदिरामध्ये लावलेल्या जाळया काढुन थेट मंदिराचे आतमध्ये सर्व ग्रामस्थ व सांईभक्तांना प्रवेश देण्यात यावा.

५. द्वारकामाईमध्ये सर्वांसाठी पादुकाचे दर्शन खुले करणे. तसेच सोन्याचे पादुकास अॅक्रेलिक शिट बॉक्स तयार करणे, स्टील ग्रील तयार करुन दर्शन व्यवस्था करणे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेत याबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेले आहेत.**

अ. १. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.११.२००६ रोजीचे सभेतील आयत्या वेळचा विषय नं.४४, निर्णय क्र.९८५ नुसार, ३१डिसेंबर रोजी हजारोंच्या संख्येने साईभक्त ज्यात अनेक मान्यवरांचा समावेश असतो, नववर्षाचे स्वागत श्रीसाईबाबांचे सानिध्यात करणेसाठी येत असल्याने दिवसेंदिवस दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे संख्येत वाढ होत असल्याने, साईभक्तांची दर्शनव्यवस्था सुलभ व्हावी यासाठी दि.३१ डिसेंबर, २००६ रोजी समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवण्यात यावे, असे ठरले.

२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१२.२००७ रोजीचे सभेतील आयत्या वेळचा विषय नं.६८, निर्णय क्र.८५२ नुसार दि.३१डिसेंबर,२००७ रोजी समाधी मंदिर उघडे ठेवण्यात यावे असे ठरले.

३. सन-२००६ व सन-२००७ चे ३१ डिसेंबरमध्ये समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवण्यात आले असल्याने त्याआधारे सन-२००८ व सन-२००९ मध्येही समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवण्यात आले होते. त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२०१० चे सभेतील विषय नं.७६, निर्णय क्र.७६नुसार गर्दीचे कालावधीत समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांना अधिकार देण्यात येत असून परिस्थितीनुसार निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.

**ब.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१.११.२०१० रोजीचे सभेतील आयत्या वेळचा मा.विश्वस्तांचे सूचना विषय नं.१६, निर्णय क्र.९५१(०६) नुसार समाधी मंदिरात गर्दीचे वेळेस समाधीस काच लावणेबाबत परिस्थितीनूरुप मंदिर प्रमुख यांनी निर्णय घ्यावा असे ठरले आहे. परंतु, याचा विचार न करता शिर्डी ग्रामस्थांनी या काचा कधीही लावण्यात येऊ नये व संस्थानने काचा लावल्यास त्या आम्ही काढुन देऊ, असे कळविले आहे.

**क.** श्रींचे द्वारकामाई मध्ये साईभक्तांचे दर्शनाची व्यवस्था कशी असावी याबाबत मंदिर विभागाकडील दि. ३१.०५.२०१० रोजीचे टिपणीनुसार द्वारकामाईत धुनीच्या समोरील पादुकांचे शेजारी स्टील ग्रील लावून पादुकांचे दर्शन घेऊन जाता येईल याप्रमाणे भक्तांची दर्शनाची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे प्रत्येक भक्त बाबांचे मुळ फोटोस हात लावत होता, ती क्रीया बंद झाली होती व दर्शनाची रांगही झपाट्याने बाहेर पडण्यास मदत होत असल्याने सदर बदल तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने करण्यात आलेले आहेत.

**प्रस्ताव-** समाधी मंदिरात साईभक्त व ग्रामस्थ श्रींचे दर्शन घेतांना काचा लावल्यास भक्तांची दर्शनाची रांग जलद गतीने पुढे चालण्यास मदत होते. परंतु, जर काचा लावल्या नाही तर, प्रत्येक साईभक्त हळुच दर्शन घेतो. पर्यायी दर्शनरांगेतील वयोवृद्ध साईभक्त व लहान मुलांना त्रास होतो. दर्शनासाठीचे चारही हॉलमध्ये गर्दी मोठया प्रमाणावर वाढते व दर्शनरांग हॉलचे बाहेर जाते. यामुळे साईभक्तांना तासनं-तास दर्शनरांगेमध्ये ताटकळत उभे रहावे लागते. यामुळे काही साईभक्त दर्शन न करता निघून जातात. याबाबत अनेक साईभक्तांनी लेखी स्वरुपात तक्रार संरक्षण विभागाकडे केलेल्या आहेत. यामुळे यावर निर्णय होणे आवश्यक आहे. तसेच यापुर्वीचे निर्णयान्वये गर्दीचे कालावधीत समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांना अधिकार देण्यात येत असून परिस्थितीनुसार निर्णय घेण्यात यावा, असे ठरले आहे. तसेच श्रींचे द्वारकामाई येथे श्रींची पवित्र धुनी व त्यालगत पादुका, माठ, परळ, निंबर, गव्हाचे पोते, जाते, मखर, सोन्याच्या पादुका, इ. पवित्र वस्तू आहेत. त्यामुळे प्रत्येक भक्ताला श्रींचे द्वारकामाईमध्ये प्रवेश दिल्यास प्रत्येक साईभक्त व ग्रामस्थ हे प्रत्येक वस्तूंचे दर्शन घेऊनच पुढे जातील व त्यामुळे दर्शनरांग खुप हळुच गतीने चालेल व गर्दी निघणे अवघड होईल.

**<u>विभागाचा अभिप्राय</u>:-** साईभक्तांचे गर्दीचे प्रमाण वाढल्यास आवश्यकतेनुसार मंदिर रात्रभर उघडे ठेवणे, समाधीस काचा लावणे याबाबत निर्णय घेता येईल. व्दारकामाई मधील असणा-या वस्तु या पुरातन असल्याने त्यांचे काळजी घेणे आवश्यक असल्याने व्दारकामाई मंदिरात दर्शनव्यवस्था स्टील ग्रील लावून पुर्वीप्रमाणेच असावी असे नम्र मत आहे.

**निर्णय क्र.२००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय स्तरावर प्रसंगानुरुप योग्य तो निर्णय घ्यावा तसेच गर्दीचे कालावधीत (दर्शन रांगेचे चारही हॉल भरल्यानंतर) कमीतकमी वेळेत जास्तीत जास्त साईभक्तांचे दर्शन व्हावे व गर्दी नियंत्रणात यावी याकरीता श्रींच्या समाधीला काचा लावण्यात याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग/ संरक्षण विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.०४** **मा.विश्वस्तांच्या सूचनांबाबत.**

**निर्णय क्र.२०१** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

(१) नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ च्या कालावधीसाठी संस्थानतर्फे वाहनतळे विकसीत करणेकामी वापरण्यात आलेल्या गौण खनिजाचे स्वामित्वधनाची रक्कम तहसीलदार, राहाता यांचेकडे भरणा करण्यात आलेली आहे, असे दिसून येते. सदरच्या स्वामित्वधनाच्या रकमेपैकी किती रक्कम कंत्राटदार मे.एस.के. येवले यांनी जमा केली व स्वामित्वधनाची किती रक्कम संस्थानने जमा केली याची चलनाचे आधारे प्रत्यक्ष पडताळणी उपकार्यकारी अधिकारी यांनी करावी व तसा अहवाल पुढील सभेत सादर करावा. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र१८५ ते २०१ सर्वानुमते घेण्यात आले.

सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

(बाजीराव शिंदे)
कार्यकारी अधिकारी
सदस्य

(अनिल कवडे)
जिल्हाधिकारी, अहमदनगर
सदस्य

(श्रीकांत कुलकर्णी)
मुख्य जिल्हा न्यायाधीश
अध्यक्ष

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी**